


# श्री साईलीला

जुलै

किं. ५० न.पैसे

१९६४

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

" जोपर्यंत हा देह आहे तोंपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत संसार सुटत नाहीं. तो कसा सुटेल ? त्याच्या बंधनांतून कोणीही निसटूं शकत नाही. मीही निसटूं शकलों नाहीं. काम, क्रोध, लोभ आदि शत्रू विविध स्वरूपांत आपल्या पाठीस हात धुवून लागले आहेत. या जीवनांत कोणाच्या ना कोणाच्या संबंधांत आपण येतोंच. मग संसार निर्माण होतो. अरण्यवास पत्करला. तरीही तुम्हीं संसारापासून मुक्त होऊं शकत नाहीं. आज तुमच्या वाट्यास जी स्थिति आली आहे ती तुमच्या देहप्रारब्धानें तुमच्या वाट्यास आलेली आहे. पूर्वजन्मीं तुमच्याकडून जें कांहीं घडलें त्याचें फळ तुम्हीं या जन्मीं बीनतक्रार भोगावयाचें आहे. तें भोगूनच सुटका. यासाठीं सतत सत्कर्माचें आचरण करावयाचें. "

— श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] जुलै १९६४ [ अंक ४ था

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६२३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक

मनुष्यमात्रांचा सर्वांत मोठा शत्रु जर कोण असेल तर तो म्हणजे रोग हाच होय. रोग म्हणजे कर्मभोग. तो कण्हत कुंथत भोगल्याशिवाय सुटका नाहीं. सुटका नसली तरी रोगग्रस्त शरीराला ज्या नाना यातना भोगाव्या लागतात, त्याचें काय ? त्या भोगत जीवन कंठण्याची कोणाचीहि तयारी नसते. तें दुःख हलकें व्हावें, नाहींसें व्हावें यासाठीं प्रत्येकाची अहर्निश घडपड चाललेली असते.

औषधपाणी, जादूटोणा, अंगारे धुपारे, जपजाप्य वगैरे नाना प्रकारच्या मार्गांचे दुःखनिवारणार्थ त्याच्याकडून अवलंबन केलें जातें, कारण तो दुःखीकष्टी माणूस आगतिक झालेला असतो. रोगनिवारणार्थ जे जे उपाय सुचविण्यांत येतील ते ते करण्याची त्याची व त्याच्या नातेवाईकांची तयारी असते.

## बाबांचें रोगनिवारण कार्य

मानवाचें दुःखविमोचन मग तें कोणत्याहि प्रकारचें असो, तें करणें व मानव सुखी, समाधानी व आनंदी करणें यासाठीं तर बाबांचा जन्म होता. कोणत्याहि प्रकारचा रोगी असो. रोग कितीहि असाध्य व जुनाट झालेला असो. जो कोणी संपूर्ण श्रद्धायुक्त अंतःकरणानें त्यांच्याकडे धांव घेत असे, तो दुःखमुक्त झाल्याशिवाय रहात नसे. जशी श्रद्धा तसें त्याला फळ मिळायचेंच.

आणि आज काल त्यांच्यामागें तरी काय ? तोच उपक्रम चालू आहे. बाबांचे रोगनिवारणाचे मार्ग मात्र फार वेगळे असत. कोणालाही आश्चर्याचा धक्का बसेल व भीतीनें त्यांचा मार्ग आचरणांत आणूं नये असें कोणालाही वाटावें ! अशीं किती उदाहरणें सांगावीं ?

## एक दाखला—

एकदां एक रोगी त्यांच्याकडे आला. तो त्यांचा भक्त होता. त्याचे डोळे सुजलेले व लालभडक झालेले होते. शिर्डी गावांत त्याकाळीं डॉक्टर, वैद्य' नव्हते. एखाद्या डॉक्टराकडे तो रोगी गेला असता तर त्यानें त्याचे डोळे प्रथम धुवून काढले असते व डोळ्यांत घालण्यासाठीं औषधाचे थेंब दिले असते; परंतु गावांत डॉक्टर नाहीं मग जाणार कोणाकडे !

सर्व डॉक्टरांचे डॉक्टर व वैद्यांचे वैद्य असे बाबा ! त्यांच्यावर तर त्याची असीम श्रद्धा ! तो उठला आणि तडक बाबांकडे आला व त्यांचे पाय त्यानें मोठ्या भक्तिभावानें धरले !

"काय रे ! तुझे डोळे बंद कां व असे सुजले कशानें ?"

बाबांच्या या प्रश्नावर त्यानें कांहीं उत्तर दिलें. बाबानीं तें ऐकून घेतलें. करुणेनें ओथंबलेलें बाबांचें अंतःकरण त्याचें दुःख व त्याची असहाय्यता पाहून द्रवलें असल्यास नवल नाहीं. ते म्हणाले, ठीक आहे. मी करतों उपचार ! कांहीं घाबरण्याचें कारण नाहीं."

बाबानीं त्यच्या डोळ्यांवर तात्काळ उपचार केला व त्या भक्तानें तो करूनही घेतला !

बाबांची सारी रीत न्यारी होती. त्यानीं कांहीं बिब्बे आणविले व ते ठेंचायला लावून त्यांतील रस त्यांनीं त्या भक्ताच्या डोळ्यांत कोंबला !

डोळयांसारख्या नाजूक अवयव कोणताही नसेल त्या लालभडक झालेल्या व सुजलेल्या डोळ्यांत बिब्बे टेचून घालायचे !

## आणि त्याचे डोळे पूर्ववत् झाले

आणि आश्चर्याची घटना म्हणजे बाबांच्या त्या राक्षसी औषधोपचरांनीं त्या भक्ताला आराम वाटून त्याचे डोळे पूर्ववत् चांगले झाले व तो रोगमुक्त झाला !

बाबांच्या काळांत घडलेलीं अशीं चमत्कृतीपूर्ण किती तरी उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत आणि आमच्या वाचकांस ती माहीतही आहेत,

येथें सांगण्यासारखी महत्वाची व मुख्य मुद्याची गोष्ट म्हणजे बाबांच्याबरोबर तें चमत्काराचें युग संपलें आहे. राहिली आहे त्यांची मानवसेवेची दृष्टि; राहिली आहे त्यांची रोगमुक्त करण्यासाठीं झटण्याची वृत्ति. राहिली आहे त्यांची सर्वसाधारण जनतेची दुःखांतून सुटका करण्याची तळमळ.

याचा अर्थ चमत्कारांचें युग संपलें असा मात्र करावयाचा नाहीं. बाबा त्या बाबतींत सर्वसमर्थ होते. ते मनांत आणतील तें करणारे होते; परंतु शिर्डीत बाबांची पुण्याई भरघोस स्वरूपांत आजही नांदत आहे. तुमच्यापाशीं भक्तिभावाचें व श्रद्धेचें भरपूर भांडवल मात्र पाहिजे. दुःखानें मस्त झालेला जो जो कोणी माझ्याजवळ भक्तिभावानें येईल त्याचा पाठीराखा मी झाल्याशिवाय राहणार नाहीं असें आभिवचन बाबानीं देऊन ठेविलें आहे. व त्याची प्रचीति त्यांच्या भक्तांना वेळोवेळीं येतच असते.

## त्याच ध्येयाची पूर्तता

रोगनिवारण, दुःखपरिहार ही बाबांची नेहमींची दृष्टि होती. मागील अंकीं माहिती करून दिल्याप्रमाणें बाबांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झालेल्या शिर्डीत त्यांच्या नांवें इस्पितळ उघडण्यांत आलें, तें शक्य तेवढें आधुनिक पद्धतीनें सुसज करण्यांत आलें. त्यासाठीं सेवाभावी अशा डॉक्टरांचें सहकार्य संपादन करण्यांत आलें व

रोग्यांचें दुःख निवारण करण्यासाठीं जें जें करणें जरूर होतें तें करण्यांत आलें. हें कार्य जितकें आवश्यक तितकेंच तें व्यापक स्वरूपाचें आहे. अजूनही संपूर्णतेच्या दृष्टीनें किती तरी गोष्टींची जोड करून द्यावयाची आहे. बाबांच्या कृपेनें यापुढील काळांत त्या उणीवा व गरजा आस्ते आस्ते दूर होत जातील, हें निश्चित होय.

## कर्मचाऱ्यावरील जबाबदारी

कोणातीही संस्था जास्तींत जास्त लोकोपयोगी होणें व नावलौकिकाप्रत जाणें हें तेथील लहानथोर कर्मचाऱ्यांच्या आस्थेवर व दक्षतेवर अवलंबून असतें याची जाणीव श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्यें कार्य करणाऱ्या प्रत्येक लहानथोर कर्मचाऱ्यानें आपल्या अंतःकरणांत कोरून ठेविली पाहिजे.

' हॉस्पिटल ' या संस्थेबद्दल जनतेंत नाना प्रकारचे गैरसमज वा अपसमज आजकाल वावरत आहेत. हॉस्पिटलमध्यें जायचें कशाला मरायला ? असें विचारणारे किती तरी लोक सांपडतील !

## गैरसमजांचें कारण

दुर्दैवाची गोष्ट आहे ही ! हा गैरसमज कां बरें पसरला ? हॉस्पिटलमध्यें बहुशः रोग्यांना मोफत औषधोपचार केला जातो आणि मोफत औषधोपचार म्हणजे त्याचा फायदा घेण्यासाठीं येणारे रोगी बहुसंख्य किंवा बेसुमार. हॉस्पिटलमध्यें रोग्यांकडे लक्ष पुरविणारे डॉक्टर्स व ज्या परिचारिका वगैरे असतात त्या पुऱ्या पडत नाहींत. त्यामुळें सहाजिकच रोग्यांकडे दुर्लक्ष होतें. त्यांची ज्या प्रमाणांत काळजी घेतली गेली पाहिजे, त्या प्रमाणांत ती घेतली जात नाहीं किंवा घेणें शक्यहि होत नाहीं. याचा दुष्परिणाम भोगावा लागतो रोग्यांना ! आणखीहि असंख्य कारणें आहेत. तीं देऊन त्या विषयाची सांगोपांग चर्चा करण्याचें हे स्थळ नव्हे.

या ठिकाणीं एक गोष्ट प्रामुख्यानें सर्वांच्या नजरेला आणावयाची आहे.

रोगनिवारण्याच्यां बाबांच्या उच्च ध्येयाला अनुसरून त्यांच्या नांवें शिर्डीत साईनाथ हॉस्पिटल उघडण्यांत आलें तें सर्वांना आदर्शवत् होऊन राहील, कीर्तिमान व वैभवशाली होईल यासाठीं वर म्हटल्याप्रमाणें प्रत्येक लहानथोर कर्मचाऱ्यानें डोळयांत तेल घालून झटलें पाहिजे.

## सेवेची सुवर्णसंधी

डॉक्टर असो, परिचारिका असो. कीं एखादा वॉर्ड बॉय असो, किंवा तेथें काम करणारा दुसरा कोणीही असो. त्याच्या मनांत नेहमीं हीं पवित्र भावना वास करीत असली पाहिजे कीं, मीं साईबाबांच्या नावें, त्यांच्या पुण्यभूमींत त्यांच्या ध्येयानुरूप स्थापन झालेल्या संस्थेंत काम करणारा कर्मचारी आहे. मला मानवसेवा

म्हणजेच देवसेवा करण्याची आयुष्यांतील ही सुवर्णसंधि लाभलेली आहे. त्या संधीचा इमानें इतबारें मी उपयोग करून घेईन. माझ्यावर सोपविलेल्या कामांत मीं कधींही टाळाटाळ, दुर्लक्ष चालढकल करणार नाहीं. बाबांच्या दरबारीं तें महत्पाप ठरेल. साईनाथ हॉस्पिटलचें वैभव वाढावें, त्याचा सर्वत्र लौकिक पसरावा व श्रीसाईनाथ हॉस्पिटल ही महाराष्ट्रांतील एक आदर्श संस्था आहे असें सर्वांनीं म्हणावें व त्याचे मुक्त कंठानें गोडवे गावे असाच मी निरंतर वागेन.

अशा उच्च भावनेनें भारलेलीं सेवापरायण माणसें जों जों अधिकाधिक प्रमाणांत साईनाथ हॉस्पिटलच्या छत्राखालीं एकत्र येतील त्या प्रमाणांत या संस्थेचा लौकिक, पसारा व उपयुक्तता वाढणार आहे. बाबांच्या कृपेनें हें सर्व घडून आल्याशिवाय रहाणार नाहीं अशी आमची श्रद्धा आहे, आणि आज ना उद्यां ती फळाला आल्याशिवाय कशी राहील !

—संपादक




## लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# अध्यात्मिक दळण

लेखक : द. शं. टिपणीस

आपण सर्व चक्कीवाले आहोंत. चक्की चालविणें हें आपलें कर्तव्य आहे. त्यासाठीं मानव देह आपण धारण केला आहे. प्रत्येकाला दळावयाचें आहे व तें त्यानें दळलें पाहिजे. आज ना उद्यां हें करणें भाग आहे. टाळूं म्हटलें तरी टाळतां येणार नाहीं. त्यांतून सुटका नाहीं. मग जें आपल्या वाट्यास आलें तें लौकर आटोपून मोकळे होणें बरें कीं टाळाटाळ आज ना उद्यां अशी दिरंगाई करीत राहणें बरें ! कैदी असतो. त्याला सक्तमजुरी झालेली असते. प्रामाणिकपणें शिक्षा भोगली, वाट्यास आलेली कामें केली तर सूट मिळून तो लौकर बंधमुक्त होईल. उलट टाळाटाळ केली, पळून जाण्याचा प्रयत्न केला तर आहे त्या शिक्षेंत वाढ होऊन त्याला अधिक काल बंधनांत राहावें लागेल. आपणा सर्वांना सक्तमजुरी-जन्मठेप झालेली आहे. आपण सर्व एका मोठ्या तुरुंगांत आहोंत. आपण बद्ध आहोंत. स्वतंत्र कोणी नाहीं. स्वतंत्र आहोंत असें वाटतें मात्र, पण तो भास आहे. षड्विकाराच्या कोठड्यांतून आपणांस बंद करून ठेवलें आहे. नाना नात्यांच्या नाजूक तंतूंनीं महामायेनें आपणा एकमेकांचे हातपाय एकमेकांशीं जखडून टाकले आहेत, तऱ्हेतऱ्हेच्या व्यवहाराच्या सोनेरी व मोहक शृंखलांनीं आपण जखडले गेलो आहोंत या तुरुंगाभोंवतीं मोहक मायेची मायावी भिंत आहे. तिचा भेद करणें महाकठीण कर्म आहे. यामुळें पळूं म्हटलें तरी पळून जाणें शक्य नाहीं. प्रयत्न केला तर बद्धतेंत वाढ होईल. चक्रव्युहांत सांपडलेले आपण अभिमन्यू आहोंत. स्वखुषीनें राजी खुषीनें हंसत खेळत आपण आंत शिरलो. पण बाहेर कसें पडावयाचें तें ज्ञान नाहीं. आपले पाय कसे अडकावयाचे हें आपण पुरेपूर जाणतो पण ते सोडवावयाचें कसें हें मात्र जाणत नाहीं.यामुळें ही बद्धता वाट्यास आली आपल्या वांट्यास आलेली कामें सचोटीनें केल्यास लौकर सुटण्याची शक्यता. दळणाचें काम आपणांस दिलेलें आहे. देणाऱ्याचा उद्देश हाच कीं, त्याच्या साह्यानें शिक्षा वाचवून मानवानें लौकर बंध-मुक्त व्हावें बद्धतेच्या तारा शृंखला कापून टाकणारी दळण ही कात्री आहे. जें बद्धतेंतून मुक्त होऊन गेले त्यांनीं आपणा सर्वांच्या कल्याणासाठीं जन्म–ठेपेंतून सुटण्याचें नानाविध मार्ग खुले करून ठेवले आहेत. त्यांत दळण हा सोपा सर्वो-त्कृष्ट मार्ग होय.

बंधनांत असलों तरी केव्हांही कुठेंही दळण्यास आपण स्वतंत्र आहोंत. तुरुंगांत आल्यावर कैद्याला जसा कटोरा मिळतो तसा आपणांस सर्वांना प्रत्येकास जातें व खुंटा देऊन ठेवला आहे. जातें ओढायचे कसें ही मात्र माहिती पाहिजे.

दळण ही मुक्ततेची गुरु किल्ली आहे. लायकीच्या दाखल्यावर गुरुकडून ती मोफत मिळते. ती मिळवून प्रामाणिकपणें दळत राहणें एवढेंच आपले काम. जगांतील नररत्नें, थोर विभुती. साधुसंत यांनीं जीवनभर भरपूर दळलें व ते चिरंजीव होऊन गेले. जनाबाईनीं भरपूर दळण दळलें म्हणून देव तिच्या घरीं आला. श्री ज्ञानराजा तर बालवयांतच सगळं कांहीं दळून साफचकाचूर व पीठ करून टाकलें म्हणून तर ते प्रतिभेचा बादशाहा व शब्द सृष्टीचे ईश्वर होऊन अजरामर झाले. संत तुकारामाला दळणाशिवाय दुसरा व्यवसायच नव्हता. त्यामुळें त्याच्या वाणींतून वेद विद्याप्रगट होऊन तो सदेह स्वर्गास गेला. महाराष्ट्रीय बहुतेक संत दळणवादीच होते व दळणाचाच मार्ग मुक्ततेसाठीं त्यांनीं आपल्या भक्तांना सांगितला आहे. जन्मठेप भोगताना मंडाल्याच्या कोठडींत लोकमान्यांनीं भरपूर दळले व गीतारहस्यासारखा जगन्मान्य ग्रंथ निर्माण केला व अजरामर झालें. म. गांधीना तर दळण्याचा हव्यास होता. राजकारणी पुरुषानें दळण केलें तर किती प्रचंड शक्ति त्याच्या ठायीं निर्माण होते हें ब्रिटिश बलाढ्य लष्करी सत्ता त्यांच्यापुढें नम्र झाली व नंग्या फकिराला ( चर्चिल साहेबांचे हें उद्गार आहेत ) बकिंमहॅम राजवाड्याचे दरवाजे खुले झाले यावरून दिसून येते. त्यावेळचा फोटो पहा. ज्यांच्या राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं व ज्यांनीं उंची वस्त्रालंकार धारण केले आहेत, अशा राजाराणी शेजारीं आमचा हा भारतीय नंगा फकीर बसलेला पाहिला की वाटतें, देवा, काय हा अध्यात्माचा प्रभाव ! सारं जग त्यापुढें नम्र आणि मग आमच्या साधुसंतांनीं आम्हांस दाखवलेला दळणाचा मार्ग किती श्रेष्ठ आहे तें पटतें.

पण दळण ! नाकं मुरडतो आम्ही. पढेलिखे आदमी आम्ही असलं काम करायचें ! आपलें सुशिक्षित मन आपणांस टोंचतें. स्त्रियांचें काम तें. लाजेनें आम्हांस खाल्लंय. शारिरीक श्रम आम्हास नकोत. मानासिक श्रम करण्याची ताकद नाहीं. असा आहे आजचा जमाना. आम्ही भारतीय मोठ्यांचा वारसा सांगण्यांत पटाईत आहोंत. पण त्यांचें अनुकरण करण्यांत आळशीच आहोंत. कांहींही असले तरी दळण हे दळलेंच पाहिजे. यास्तव हलकेपणाचे नसते किंवु न बाळगतां ज्याला म्हणून आपलें कल्याण करून घ्यावयाचें आहे त्यांनें हें काम जमेल तसें प्रामाणिकपणें करीत राहिलें पाहिजे. अन्न व अध्यात्म या दोहोंतही दळण्याची आवश्यकता आहे. दळल्याखेरीज आधुनिक नाना खाद्यपदार्थ होणे नाहींत तद्वत् दळल्याखेरीज अध्यात्मिक नानाशक्तींची वाढ होणें नाहीं. या दळणांत एक अट आहे व ती म्हणजे स्वतः दळलें पाहिजे. व मार्गदर्शनापुरते इतरांचे साहाय्य. बाकी श्रम ज्यांचे त्यानेंच केलें पाहिजेत. गिरणींतून थोडया मोलानिशीं नि अल्पश्रमांत तें दळून आणून उपयोगी नाहीं व तें तसें आणतांही येत नाहीं. जिला स्वयंपाक शिकावयाचा आहे तिनें स्वतां भांडीच चढविली उतरविली पाहिजेत, स्वतांच्या हातानें चार गोष्टी केल्या पाहिजेत. खाणावळींतील आयते आणून कोणती स्त्री सुग्रण झाली आहे ? सायकल शिका-

बयाची तर स्वतां बसलें पाहिजे, पडलें पाहिजे, धडपडलें पाहिजे, खरचटलेलें सहन केलें पाहिजे. चार पैसे देऊन दुसऱ्याला बसविल्यानें काय आपण सायकल पटूं होणार ? पोहणें येण्यासाठीं स्वतां पाण्यांत उतरलें पाहिजे, डुंबले पाहिजे. गटांगळ्या खाल्ल्या पाहिजेत. असंच अध्यात्मांत आहे. भाडोत्री कामें निकामी आहेत. आधुनिक यांत्रिक उपकरणें या कामीं निरुपयोगी आहेत. अंतर्गत यंत्रणा कौशल्यानें हवी तेवढी उपयोगांत आणावी. दळायचें तें निटनेटके व्यवस्थित पाहिजे. जात्यांची नुसती घरघर उपयोगी नाहीं. त्याला चाल ( rethem ) पाहिजे. पीट बारीक आलें पाहिजे. भरडा वा डाळ करण्यासाठीं दळावयाचें नसतें तर अगदीं बारीक पीठ येण्यासाठीं. चाळणीची जरूर लागतां नये. पुन्हां विचित्र गोष्ट अशी कीं हे दळलेलें पीठ स्वतां उपयोगांत आणावयाचें नाहीं व इतरांसाठीही त्याचा उयोग करावयाचा नाहीं, त्यांत हानी आहे. दळलेलें पीठ वेशीबाहेर जीवनाच्या वेशीबाहेर फेकून दिलें पाहिजे. पुन्हां त्याचा स्पर्शही जीवनाला होतां कामा नये. नाहींतर सगळंच मुसळ केरांत जाऊन केलेलें श्रम वाया जातील व अध्यात्मिक घसरगुंडी होईल. दळण जसं सफाईदार तसंच आवाजरहीत पाहिजे. जो दळतो त्यालाच तें ऐकूं आले पाहिजे. सतत सरावानें हें साध्य होते. कसा तरी आवाज करणारे दळण उपयोगी नाहीं. असलेंच तर दगडापेक्षां वीट मऊ एवढेंच. श्री. चांदोरकर हे बाबांचें एक भक्त श्रेष्ट होते. एकदां चांदोरकर पत्नींना बाबा म्हणाले, " तूं लई दळतेस पण समदं भरड. " घरीं गडी माणसे असतांना आपल्याला कधीही दळण्याचा प्रसंग येत नाहीं असें असतां बाबा हें काय म्हणाले हें बाईंना कळेना. घरीं गेल्यावर त्यांनीं यजमानाना सर्व सांगितलें व बाबा जे बोलले त्याचा अर्थ काय असें विचारलें. चांदोरकर म्हणाले, " तूं दळतेस म्हणजे नामस्मरण करतेस पुष्कळ पण अव्यवस्थित. "

याला म्हणतात अध्यात्मिक दळण. हें दळण दोन प्रकारें करतां येतें. त्यासाठीं दोन प्रकारची जातीं आहेत. दोन्हीही जातीं व ती चालविण्यास जरूर ती साधनें निसर्गानें मानवास देऊन ठेवली आहेत. एक नामस्मरणाचें व दुसरें अनासक्तीचें वा समतेचे. पहिल्या प्रकारच्या जात्याचें खालचें पाळें चित्त व नाम हें वरचें पाळें. निष्ठेच्या खुंट्याच्या साह्यानें चित्तावर नामाचें घर्षण चालू केलें कीं दळणाची क्रिया चालू होते. दुसऱ्या प्रकारच्या जात्याचें खालचें पाळें कर्म व वरचे अनासक्ति वा समता असून त्याला ज्ञानाचा खुंटा आहे, कर्मावर अनासक्तीचे संस्कार होऊं लागलें की दळण सुरू झालें. धान्य म्हणून आपले विकार, इच्छा, पापे, सत्त्व, रज, तम गुण व अहंकार यांचा उपयोग केला जातो. जात्यांत टाकलेलें धान्य मध्याकडे खेंचले जाऊन त्याचा चकाचूर होऊन पिठाच्या रुपानें तें बाहेर फेकलें जातें. तद्वत

आपण आपली चक्की सुरुं केली कीं वरील सर्व धान्यें मध्याकडे आत्मतत्वाकडे खेंचली जाऊन त्यांचा साफ चुराडा होऊन भुकटीरुपानें तीं जीवनाच्या बाहेर टाकलीं जातात. दळण्यांत चिंतन व मनन आहे. श्री. साईबाबांची अनुभवानें पूर्ण खात्री झाली होती कीं अहंकार, गुण त्रिप्रकार, व सर्व विकार यांचा चक्काचूर झाल्यालेरीज आत्मज्ञान होणें नाहीं. हें साध्य करून घेण्याच्या क्रियेला ते दळण असें म्हणत व स्वतां वारंवार दळून त्याची जाणीव ते आपल्या भक्ताना देत असत. आजही ते तेंच कार्य पण मूकपद्धतीनें करीत आहेत. हें शिर्डी येथील द्वारकामाईतील जातें व गव्हाचें पोतें पाहून ध्यानांत येतें. जे भाग्याचे आहेत त्यांच्या नजरेंत तें जातें व तें पोतें येऊन हीं येथें कां असा प्रश्न उद्भवतो व कालांतरानें बाबा त्यांचें समाधान करतात. बाबांच्या अध्यात्मिक जीवनांचें व मार्गांचें भक्तांना स्मरण देणाऱ्या अशा तीन गोष्टी शिर्डींत आहेत. त्या म्हणजे जातें, धुनी व दीप [ समया ] या होत. तिन्हीहि एकत्र द्वारकामाईत आहेत हें विशेष. हीं स्मरणचिन्हें संस्थाननें तशीच सरकारने कायम राखावीत. कारण ती बाबाची स्मृतिचिन्हें आहेत व त्यांत फार खोल अध्यात्मिक अर्थ आहे.

बाबांना दळणाची हौस होती. ‘ दळण ’ हा बाबांचा सांकेतील शब्द आहे. अनेक सांकेतीक शब्द बाबांनीं वापरले आहेत. उदा. निंबवृक्ष, अल्ला, साई, रोहिला, गुरुवार, शुक्रवार वगैरे. बाबांचें सर्व आचरण, शिकवण व तत्वज्ञान इशावास्योपनिषद व भगवद्गीता यांना धरून आहे. म्हणून त्यांच्या आचरणांत व वाणींत वेदांत भरलेला असे. परंतु हा वेदांत त्या वेळच्या परिस्थितीस साजेल अशा व खेडवळ अडाणी भोळ्या भाबडया जनतेला समजेल अशा भाषेंत त्यांनीं तो वेळोंवेळीं गोष्टी वा घटना रूपानें व्यक्त केला आहे. बाबांचे दळण व गीतेंतील ज्ञानयज्ञ परिणामीं समान आहेत. परंतु गीतेंतील यज्ञाचें रूपक खेडवळ जनतेला काय कळूं शकणार ? शिवाय पूर्वींचें यज्ञ हे आजच्या जमान्यांत आऊट ऑफ डेट झाले आहेत. वास्तव खेडोपाडीं जनतेच्या नित्यजीवनांत येणारे जे दळण त्या दळणाचा उपयोग करून बाबानीं आपल्या भक्तांना शिकवण दिली आहे. गीतेंत आलेल्या ज्ञान-यज्ञाचे श्री. दाभोळकर यांनीं सई सात्चरित्रांत पुढील प्रमाणें केलें आहे. त्यावरून ज्ञानयज्ञाची कल्पना येईल.

आतां ज्ञान यज्ञाचें स्वरूप। अहंब्रह्मास्मि जेथील यूप।
पंचमहाभुते यज्ञमंडप। जीवेश्वर भेद पशु तेथें ॥
पंचइंद्रियें पंचप्राण। हेंच यज्ञाचें उपचार भरण।
मनबुद्धिचिया कुंडांमधून। प्रदिप्तीकरण ज्ञानाग्नीचें ॥
यज्ञकर्ता जीव यजमान। करी अज्ञान घृतावदान।
आत्मानंद रसी निमग्न। अवभृत स्नान जीवा घडे ॥

तात्पर्य अज्ञान वृतांवाचून । कदान प्रगटे ज्ञानहुताशन ।
जीवेश्वर भेदाते जाळून । अभेद ज्ञान प्रगट करी ॥

हें वाचल्यावर चटकन ध्यानीं येईल कीं अध्यात्मिक शब्दांनें दर्शविलेले हें रूपक सामान्य व भोळ्या भाबड्या जनतेला कितीसे कळेल. यामुळें बाबांची दळणाची कल्पना अधिक रम्य व आपुलकीची वाटली तर नवल नाहीं. दळणाचा सांकेतिक अर्थ लक्षांत घेऊन आपल्या भक्तांनीं रोज थोडे कां होईना पण दळावे अशी त्यांची इच्छा आहे. भक्तांनीं असें केलें तर त्याची सांगता काय होईल, मी त्यांच्यासाठीं काय करीन हें ही बाबांनीं स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें आहे.


साई साई नित्य म्हणाल । सात समुद्र करीन न्याहल ।

---


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बना**:—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहा:...



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# गीतेचा व्यावहारीक उपयोग

लेखक : वि. के. छत्रे

## [ पूर्वार्ध ]

भगवद्गीता ही केवळ मोक्षाचा मार्ग दाखविणारी असून म्हातान्या कोतान्यांशीं, भाविक स्त्री-पुरुषांनीं व मुमुक्षूंकानीच वाचावी अगर ऐकावी अशी कित्येक लोकांची चुकीची समजूत असते ती खरी नसून गीता ही अभ्युदय-( ऐहिक कल्याण ) व निश्रेयस ( सद्गति ) मिळवून देणारी आहे गीता ऐकून मोहग्रस्त भांबावलेला व मरगळलेला अर्जुन युद्धाला तयार झाला, पुरुषार्थास प्रवृत्त झाला. पराक्रमाची शर्थ करून त्यानें जय मिळवून राज्य मिळविलें, ऐश्वर्य भोगलें व शेवटीं सद्गतीहि मिळविली.

गीताभ्यासानें मरणांती सद्गति मिळेल की नाहीं. हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. गीताभक्ताला सद्गति मिळाली कीं नाही हें त्याच्याकडून प्रत्यक्ष कळणे अशक्य असलें तरी 'अन्ते मतिः सा गतिः' या न्यायानें ती त्याला मिळाली कीं नाही हें त्याच्या अंतकाळीं जवळ असल्यास अजानपणें शक्य आहे; व तशी त्याला मिळाली नसावी असें दिसून आलें तर तो दोष गीतेचा नसून अभ्यासकाचा होय असें म्हणतां येईल 'ज्यानें विठ्ठल मात्रा घ्यावी, त्यानें पथ्यें सांभाळावीं' या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें त्या भक्तानें पथ्यें सांभाळलीं नसतील– त्याला पाळतां आली नसतील.

सद्गतिलाभाचा विवाद्य वाटणारा मुद्दा घटकाभर बाजूला ठेवला तरी गीता ही अभ्युदय मिळवून देणारी कशी आहे हें निश्चित पणें दाखवितां येईल तसें भगवंतच्या वचनाधारेंच येथें दाखविण्याचा प्रयत्न केला आहेः—

(१) वस्त्रें जुनीं टाकुनि जेंवि देई
आणी नवीं मानव ऑगिं लेई ।
जुनीं शरीरें त्यजुनी तथैव
करीं नवीं धारण देहि जीव ॥ २–२२
जो जन्मला निश्चित मृत्यु त्यास
ये निश्चयें जन्म पुन्हां मृतास २–२७

अज्ञानी माणसाला मरणाइतकी भीति दुसऱ्या कशाचीही वाटत नाहीं. पण 'मरण म्हणजे केवळ देह बदलणें. फाटलेलें जुनें वस्त्र आपण टाकून देऊन नवें घालतों, त्याप्रमाणें फार वापरून झिजलेला, अकार्यक्षम झालेला देह टाकणें म्हणजेच मरण.' असें त्याला सांगितलें तर त्याची मरणाची भीति कमी होईल. मरणाची भीति

ज्याच्या मनांतून जाईल तोच पुरुषार्थाला प्रवृत्त होईल. पुरुषार्थ याचा अर्थ पराक्रम. पुरुषानें अगर स्त्रीनें केलेला. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आनंदानें फांसावर चढणाऱ्या भगतसिंगासारख्या क्रांतिकारक देशभक्तांनीं गीतेच्या या तत्त्वज्ञानापासूनच स्फूर्ति घेतली होती. गीतेचें पठण करून गीता हातांत धरून ते फांसावर चढले. या विषयांवर साने गुरुजींनीं 'भारतीय संस्कृति' या ग्रंथांत 'मृत्यूचें काव्य' या प्रकरणांत सुंदर रूपक केलें आहे.

'जगन्माउलीचीं आपण सर्व मानव हीं लेकरें. एकाद्या मुलास त्याचें अंगडें होत नाहीं. अगर फाटलें आहे असें आईस आढळलें तर ती तें काढून टाकते, व दुसरें चांगलें बसेल असें त्याच्या अंगांत घालतें. तशीच जगन्माउलीही आपल्या लेकरांच्या बाबतींत करते.'

एकादा आपल्या जवळचा नातेवाईक मरण पावला तर भगवंतांच्या या दोन वचनांनीं आपल्यास धीर वाटतो. व झालेलें दुःख गिळून आपण हळूंहळूं कामास आपल्या लागतों. आपल्यालाही एक दिवस असेच मरावयाचें आहे तर तोंपर्यंत यापुढें [ मागें कसेंही वागलों असलों तरी ] लोक मागें 'भला' म्हणतील असें वागायला पाहिजे ही जाणीव मनांत उत्पन्न होते, हा कांहीं थोडा लाभ नव्हे.

( २ ) दुष्कीर्ति संभावित मानवातें
मृत्यूहुनी दुःसह फार वाटे ॥ २-३४

संभावित माणसाला ज्याला अब्रूची चाड आहे त्याला—दुष्कीर्ति होण्यापेक्षां मरण बरें वाटतें. चारुदत्तानें वसंतसेनेच्या वधाच्या आळामुळें फांसावर जातांना काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः ।
विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्मसमः किं ॥

मी फांसावर जावयास भीत नाहीं. पण माझ्या अब्रूला निःष्कारण डाग लागला याचेंच मला फार दुःख होत आहे.

अजूनही माझ्यावरचा आळ दूर होऊन जरी मला फांसावर चढविण्यांत आले तरी पुत्रलाभाचा आनंद मला खरोखरच होईल. शीलभ्रष्ट होण्यापेक्षां रजपुत स्त्रियांनीं स्वतःस अग्नींत आनंदानें जाळून घेतलें. व्यवहारांत माणसानें एक वेळ द्रव्य जाऊं द्यावें, मरणाचा धोका पत्करावा, पण अब्रूला धक्का लागेल असें वर्तन मोहवश होऊन करूं नये.

( ३ ) या जन्मि जें कर्म जिवाकडून
झालें तयांच्यासह तें मरें न ।
न विघ्न येई, जरी अल्पची तें
महाभयापासून तारि त्यातें ॥

कोणत्याही कामाला आरंभ केलेला फुकट जात नाहीं आज थोडेंसे केलेलें काम उद्यां पुढें चालू करतां येतें' तें पूर्ण करतां आलें नाहीं तरी केलेलें वेळीं उपयोगाला येतें. लहानपणीं थोडेंसें पोहावयास शिकलेला माणूस अपघातांत पाण्यांत पडला तर लगेच बुडत नाहीं. हातपाय हलवून मदत मिळेपर्यंत जीव वांचविण्याचा स्वतः प्रयत्न करूं शकतो.

लहानपणीं ज्याला घरांतील अडचणीमुळें स्वयंपाक करावा लागला तो कुठेंही उपाशीं मरत नाहीं. मुंबईंत मागें दंग्याचे वेळीं एक गृहस्थ घरीं एकटाच होता. घरांत डाळ तांदूळ वगैरे स्वयंपाकाचे साहित्य असूनही स्वयंपाक करतां न आल्यामुळें व बाहेर हॉटेल अगर खाणावळींत जाणें अशक्य झाल्यानें बिचाऱ्यावर दोन दिवस उपाशीं राहण्याची पाळी आली. तिसरें दिंवशीं अचानक एक पाहुणा त्याचेकडे आला. त्याला स्वयंपाक करतां येत होता त्यानें स्वयंपाक केला तेव्हां यजमानाला जेवावयास मिळालें. लहानपणीं गाण्याची शिकलेली कला प्रौढपणीं कीर्तनाला उपयोगी पडते. लहानपणीं बालमनावर केलेले चांगले संस्कार प्रौढपणीं त्याचें जीवन उज्ज्वल करण्यास कारणीभूत होतात हें थोरपुरुषांच्या चरित्रा-वरून आपणांस दिसून येतें.

(४) कर्मींच कौन्तेय तवाधिकार
फलीं न त्याचा न करीं विचार ।

मनुष्याला कर्म करण्याचा अधिकार आहे म्हणजे त्याला कर्म केलें पाहिजे. प्राप्त कर्म—वांट्याला आलेलें काम—त्याला टाकतां येत नाहीं. आई आजारी पडली. अंथरू-णाला खिळली—तर तिची शुश्रूषा मुलानें केली पाहिजे, औषधपाणी तिला दिलें पाहिजे. हें त्यानें केलें नाहीं तर कर्तव्यच्युतीचा दोष त्याला लागेल. तसेंच त्याचें आजारीपणांत त्याचे मुलानें त्याचेकडे लक्ष दिलें नाहीं तर त्याला आपण आपल्या आईबद्दलचे कर्तव्य केले नाहीं याचा पश्चात्ताप होईल. पण ती केलेली चूक आता सुधारतां येणें अशक्य असतें.

फलावर सारखी नजर ठेवून कर्म करण्यांतही धोका असतो. वरील उदाहरणात आई कदाचित् मृत्यु पावली तर मुलाने जर शुश्रूषा करतांना ती बरी झालीच पाहिजे असें मनाशीं गृहीत धरले असेल तर त्याला मोठाच धक्का बसतो. एकादे वेळीं त्या धक्क्यानें मृत्यूही येतो. या उलट, मी माझे कर्तव्य करीत आहे ही भावना असेल तर तसा धक्का न बसतां कर्तव्य केल्याचें समाधान मनास मिळेल व हेंच समाधान माण-साला सुखी करतें. डोंगराचे शिखरावर जातांना शिखराकडे दृष्टि लावून चढत राहिल्यास.

अरे बापरे.

केवढी मोठी ही चढण ! असे मनांत येऊन उत्साह मावळेल व परत फिरावेसें वाटेल. दृष्टि वर लागल्यामुळें पायापुढला मोठा दगड अगर खळगा न दिसल्यानें

पायाला दुखापत होईल म्हणून पायापुढील रस्त्यावर दृष्टि ठेवून धिमेपणानें जो चढण चढत राहील तो शिखरावर सहज पोंहोचेल.

(५) सदैव ध्यातां विषया मनांत
तयासवें स्नेह जडे नितांत ।
तो स्नेह कामाप्रति देइ जन्म
ये क्रोध भारी, पुरतां न काम ॥
येई यदा क्रोध सुटे विचार
स्मृति कशी ती मग राहणार ?
विनष्ट होतां स्मृति बुद्धि–नाश
जातां लया ती मग सर्वनाश

कोणत्याही भोग्य विषयाचें चिंतनांत माणूस रिकामपणीं रमला म्हणजे तो विषय हवासा वाटूं लागतो. ताबडतोब हवासा वाटतो. अर्थात ताबडतोब तो मिळेलच असें नेहमीं होणें शक्य नाहीं. तसा तो मिळला नाहीं कीं त्या माणसास क्रोध येतो. क्रोधाधीन मनुष्य झाला कीं विवेक सुटतो. विवेक सुटला कीं स्मृति नष्ट होते त्याचे पुढें बुद्धिनाश व शेवटीं सर्वनाश !

शेजारच्या माधवनें आणलेला सुंदर चेंडू आपल्यास बाबा आणून देत नाहींत व माधवही आपणास हवा तेवढा वेळ तो खेळण्यासाठीं देत नाहीं म्हणून गोविंदास त्याचाच ध्यास लागतो. रागाच्या भरांत तो गोविंदाच्या घरीं गुपचूप जाऊन त्याचा चेंडूच दाभणानें फोडून टाकतो. तेवढ्यांत माधवची धाकटी बहीण तेथें येते य गोविंदा भानावर येतो. व शरमतो. त्याच्या या अपकृत्यामुळें माधवचा चेंडू नाहींसा झाला गोविंदास एकादे वेळेस त्याजबरोबर खेळावयास तो मिळाला असतां तोही मिळण्याची शक्यता नाहींशीं झाली, व दुष्कृत्याबद्दल बेअब्रूही झाली व या सर्व मानगडींत अभ्यासांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे परीक्षेत अपयश आलें ! शिवाजीमहाराजांचे निधनानंतर मराठी साम्राज्याच्या पुरा विध्वंस करण्याच्या उद्देशानें औरंगजेबानें दक्षिणेत मोहीम काढली. पण उदिष्ट सफल न होऊन राजधानीस परत न जातां अहमदनगरलाच त्याला देह ठेवावा लागला.

अल्लाउद्दिन खिलजीनें पद्मिनी मिळविण्यासाठीं खूप रक्तपात केला" पण शेवटीं हातीं काय आले ?

पद्मिनीची राख व फजिती !

देवांस एणेंपरी तोषवावें
करोत ते तुष्ट तुम्हां स्वभावें
परस्परां यापरि तोषवून
घ्या थोर कल्याण तुम्ही करून ॥ ३·११

(६) होतील यज्ञें सुर फार तुष्ट
देतील ते भोग तुम्हांस इष्ट
न अर्पिता सादर त्या सारूज
जो सेवि तो चोरचि, संशयो न ॥ ३-१२
यज्ञांतुनी जें अवशेष राही
तें सेवितां पाप अशेष जाई।
प्रत्यक्ष ते पापचि सेवितात
जे अन्न आत्मार्थचि रांधतात ॥ ३-१३

सहकारांत सुख आहे. द्यावें व घ्यावें हा जगाचा व्यवहार समाज स्वास्थ्यासाठीं सहकाराची फार आवश्यकता आहे. जो फक्त घेणें जाणतो व देण्याची यात करीत नाहीं त्यानें कितीही धनसंचय केला तरी त्यापासून त्याला खरें सुख समाधान मिळत नाहीं. घरांतला कर्ता पुरुष घरांतील माणसांचे फक्त कष्ट घेईल व त्यांना खायला प्यायला ल्यायला योग्य तऱ्हेनें देणार नाहीं तर तीं असंतुष्ट राहतील व उघड-पणें बोलून दाखविलें नाहीं तरी मनांतून त्याचें अकल्याणच चिंततील व सहनशील-तेची पराकाष्ठा झाली म्हणजे त्याला सोडून जातील. तो मरायला टेकला तरी ज्याची संपत्ति त्याच्या फारशी उपयोगी पडणार नाहीं. मोलें घातलें रडाया. भाडोत्री माणसें पैसे उडवतील पण जिवाभावाच्या माणसांनीं त्याची शुश्रूषा जशी केली असती तशी करणार नाहींत. व मग त्याचे डोळे उघडतील !

मोठ्या कारखान्यालाही हीच गोष्ट लागू पडते. कामगारांना योग्य वेतन सुखसोयी पुरविणारा मालक—कमी फायदा घेऊनही सुखानें झोपतो. याउलट कामगारांना पिळून, त्यांचें रक्तशोषण करून गबर फायदा घेऊन भव्य प्रासादांत पंख्याखाली पराच्या गाद्यावर लोळणाऱ्या मालकास सुखाची झोप येत नाहीं. कामगार संप करतील कीं काय, संप केलाच तर काय उपाय—योजना करावी या चिंतेंत रात्रभर तो तळमळत राहतो.

आपण जें कांहीं मिळवतों त्यांत आप्त इष्टमित्र अतिथि यांचाही वाटा असतो तो त्यांस संतोषानें देऊन उरलेल्या संपत्तीचा उपभोग घेणारास खरें सुख लाभतें.

गंगूला दाणें कुटावयास सांगावयाचे पण तिला खावयास चार दाणे न देणें अयोग्य. तिला आपण होऊन चार दाणे दिले तिला तर मूठभर चोरून खावेसें वाटणार नाहीं ?

# मी व माझे अस्तित्व.

## लेखांक १० वा

[ मागील अंकावरून समाप्त ]

लेखकः—केशव कृष्ण प्रधान

ती अमृतवाणी तशीच स्त्रवू लागली. अरे ! आधीभौतिक शास्त्रांचें वरील-प्रमाणें सर्वज्ञान तुला झालें तरी देखील तुझे मन 'निःसंशय महा बाहो प्रमाथि बलवद् दृढं' असेच रहाणार. तू योगाच्या निरनिराळ्या अवस्थामध्ये वरवर जाऊं लागलास तरी देखील हे मन वाटेमध्ये नाना तऱ्हेची दृश्यें निर्माण करून आपण खूप मोठ्या अशा योगीक अवस्थेला पोहोचलो आहोत असा तुझ्या मनांमध्ये भास निर्माण करील. पण लक्षांत ठेव कीं त्या सर्व मनाच्या माकड चेष्टा आहेत. मन हें आकारप्रिय असल्याने योगी अवस्थेमध्यें ते अंतरंगांत नाना तऱ्हेचे आकार धारण करून तुला फसविल. जीपर्यंत तूं मनबुद्धीच्या प्रांतापलीकडे गेला नाहींस तो-पर्यंत तुला होणारी देवदेवतांची दर्शनेंसुद्धां भ्रामक व कुचकामीं आहेत. तोपर्यन्त मनानें बहींसृष्टींत बघितलेली क्षुद्र दृश्यें अंतरंगात कांहीं श्रेष्ट विभूतींचे आकार घेऊन तुझ्या समोर नाचतील. पण त्याला तूं अनुभव म्हणून फसू नकोस. बाहेरील गाढवाचे स्वरूप आंतमध्ये एखाद्या देवतेचे स्वरूप धारण करील, व तुला भ्रमात टाकील 'यद दृष्टं तर नष्टं' हे वाक्य लक्षांत ठेऊन त्या दृश्याची व त्या निर्गुण निराकार परमेश्वराची गल्लत करु नकोस. दिल्लीला जावयाचे असता दिल्ली-गाठीपर्यन्त डब्यांच्या सर्व खिडक्या दरवाजे बंद करुनच दिल्ली गाठ. परत येतांना वाटेल तिकडे उतर. त्यानें तुझे कांहीं एक नुकसान होणार नाहीं. अरे कुंडलीनी कुंडलीनी म्हणतात ती तरी काय आहे ? शरीरांतील सर्व नाड्यांतून चैतन्य खेळूं लागले कीं, पाठीच्या कण्यातूनच वर जाणारी तीच कुंडलीनी, व शरीरांत इतर ठिकाणी तिचा अनुभव येत नाहीं हे म्हणणें सवर्था गैरच आहे. शरीरशास्त्राप्रमाणें आपल्या शरारातील पेशी पेशींना सुद्धा स्वतःची वैयक्तीक भावना व बुद्धी असून ज्याला तू इंग्रजीत Personality म्हणतोस ती सुद्धां आहे. प्रत्येक पेशीची संवेदना व Coscionsuess हा वेगळा असून तिचे कार्य ही वेगळें आहे. कांहीं पेशींना तुझे दात तयार करावयाचे काम, तर कांहींना तुझें केस तयार करावययाचे काम, तर काहींना तुझ्या हाडांचा विकास करावयाचे काम, वगैरे वगैरे कार्यें नेमून दिलेली आहेत व ती त्या न चुकता करीत आहेत. सांगावयाचे कारण की अशा तऱ्हेनें तुझ्या शरीरांतील पेशी पेशीमधला Consciousness जेव्हां तुला कळूं लागेल तेव्हां

तू कुंडलीनीच्या कल्पनेला हंसशील. खरें म्हणावयाचे म्हणजे Kundalini is a fiction असेंच तेव्हां तुला वाटेल. याचें श्रीं ज्ञानदेवांनी फारच सुंदर असें वर्णन केलें आहे. एखादा माणूस नदीमधून नावेतून या तिरावरून त्या तिरावर गेला व नंतर आपण कोठल्या मार्गानी आलो, तो मार्ग मागे वळून बघूं लागला तर तो जसा त्याला सांपडत नाहीं त्याप्रमाणें ज्या योग्याच्या कणाकणामधून चैतन्याचा प्रवाह स्वसंवेदने सुरू झाला आहे त्याची तशीच स्थिति होते. असे Matter Can be Converted into Energy and Energy is conciousness हे तत्व योग्याला पूर्णपणें अनुभवास येण्यास योगाच्या अभ्यासाला सुरुवात केल्यानंतर कित्येक वर्षें लागतात. सर्व संतानीं आतांपर्यंत मायेतून ब्रम्हांत कसें जावें हे शिकविले आहे. परंतु ब्रम्हज्ञान झाल्यानंतर माया ही माया आहे हे कळल्यावर सुद्धां त्या भ्रामक स्वरुपाचा आनंदमय अनुभव कसा घ्यावा हे शिकविले नाही व त्यामुळें आपल्याकडे ब्रम्हज्ञान झाल्यावर योगी शक्यतोंवर या जगाशीं आपला कोणत्याही तऱ्हेचा संपर्क ठेऊं पहात नाही. हें चुकीचे आहे जगांतील वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक राजकीय या नेहमी बदलणाऱ्या वेगवेगळ्या विचारांशीं व स्थितिंशी खरे पाहिले असता योग्याचा फार निकटचा संबंध आहे. कारण कीं या बद्दलच्या सर्व तऱ्हेच्या परीस्थितीतून योग्याला सर्व अणूरेणूचा, प्राणीमात्रांचा, मानवांचा matter to sprit हा प्रवास फारच सुंदर तऱ्हेनें दृष्टीस पडतों व त्यांची सतत होणारी उत्क्रांती विशद तऱ्हेनें दिसल्यामुळें त्यास एक प्रकारचा अनभूत असा आनंद प्राप्त होतो. या आनंदाचा पुरेपूर अनुभव घ्यावयाचा कीं यापासून दूर पळावयाचे ? खरे म्हणावयाचे म्हणजे ब्रह्मज्ञान होत असताना व ते परीपक्व झाले नसतानाच फक्त वैराग्याची ( म्हणजे वीत राग भय याची ) खरी जरूरी आहे. तोपर्यंत साधकाला येणारे वैराग्याचे झटके क्षणीक असतात. निराकार व निर्गुण परमात्म्याचा साक्षात्कार होण्याच्या वेळेपूर्वी अतीव वैराग्यानें योग्याची जी तळमळ होते त्याचें वर्णन एका साधकानें खालील शद्बांत केलें आहे :

नको देवा आतां ( माझे ) उघडू नयन. न सहावे जीवन ऐसे आतां। ह्या स्थितींत योग्याला परमेश्वर अनंत सृष्टी निर्माण करून मानवाला भूलवू रमवू शकत नाहीं याचा प्रत्यय येतो. हे सर्व करून मानवाच्या दृष्टीनें तो सर्वशक्तीमान परमेश्वर शेवटी भिकारी आहे असे वाटते. सर्व तऱ्हेचे वैषयिक सुखोपभोग व भोवतालची आनंदस्वरुपानें नटलेली पृथ्वी त्याला रूक्ष निर्जन ओसाड अशी भासते. व तो परमेश्वर प्राप्तीसाठी शरीर, मन, बुद्धि एकत्र करून एकाच अक्रोशानें परमेश्वरभेटीसाठीं टाहो फोडू लागतो. या स्थितींत तो दयामय प्रभु त्यास किती वेळ ठेवणार ? एकाएकी कायीक मानसिक, भौतिक बंधनातून सुटल्याचा त्याला दिव्य अनुभव येऊ लागतो. व आपण कोणत्या तरी अफाट अगाध अति सूक्ष्म विरळ अशा एका अवर्णनीय निराकार

निर्गुण स्वरुपात विलीन होत आहोत व त्यात पार विरुन जात आहोत असें रोमरोमीं वाटू लागते. तीच योगसाधनेची अंतीम स्थिति आहे. येथेच त्याची निराकार निर्गुण स्वरुपाची एकदम दिव्य मिठी पडते.व त्यानंतर डोळे उघडल्यावर भोवतालचे विश्व कीं जे त्याला यापूर्वी निर्जन, निरस ओसाड असें वाटत होतें तेच फारच सुंदर विलोभनीय व परमेश्वराचा नित्य बदलता विलास या स्वरुपांत दिसूं लागते. व त्याचे तोंडून नकळतच जे उद्‌गार बाहेर पडतात ते एका साधकानें खालील कवितेंत फारच सुंदर तऱ्हेनें वर्णन केले आहेत—

जाहला सुरु हा जीवन उत्सव
सर्व प्रान्त आतां फळा आला ॥ १ ॥

जीवन वृक्ष हा फळभारें लवला
लागला क्षेत्रज्ञ कापणीला ॥ २ ॥

दशदिशीं जहालें अमृतसिंचन
अणुरेणु जीवन फोफावले ॥ ३ ॥

चैतन्य सागरी उठली जी लाट
भिडली ती थेट आकाशाला ॥४॥

सांडीयेल्या जीवे शिवाच्या मर्यादा
धावतो गिळाया आदिअंत ॥५॥

तात्पर्य काय जोंपर्यन्त योगी या मायिक भ्रमस्वरूप सृष्टीपासून दूर पळण्याचा प्रयत्न करतो, तोपर्यंन्त त्याला परमेश्वराचा निराकार निर्गूण स्वरूपाचा म्हणजेच पूर्ण ज्ञानाजा अनुभव आला नाहीं असें समजावे लागते. हरिंची माया कितीहि प्रबळ असली तरी देखील योगी जेव्हां परमेश्वरी आनंदमय स्वरूपाचा एक अविभाज्य घटक होतो, तेव्हां त्याची प्रज्ञा त्या आनंदाने इतकी पूर्णपणे भरून जाते कीं युगायुगांच्या सवयींमुळें जरी त्याचे चित्त क्षणभर मायेनें विचलीत केले तरी तितक्याच जलद, स्थितप्रज्ञतेमुळें त्याचा भ्रमनिराश होतो. सर्वसाधारण, योग्यामध्यें व स्थितप्रज्ञामध्यें हाच मोठा फरक आहे. प्रज्ञा कितीही स्थीर झाली तरी देखील जोंपर्यन्त स्थितप्रतानें शरीर धारण केले आहे तोपर्यन्त क्वचित या हाडामासाच्या ओढीचा परिणाम त्याच्यावर अगदी किंचीत् असा होणे हें अगदी नैसर्गिक आहे शरीराचा कण न् कण हरीमय व्हावयास स्थितप्रज्ञतेची क्रिया रक्ताप्रमाणें शरीराच्या दूरवरच्या भागापर्यंन्त पोहचावी लागते. स्थितप्रज्ञतेचा आणि शरीरांतील नैसर्गिक उदर भरण, जलप्राशन, निद्रा, शितोष्ण, सहन करण्याची शक्ति याचा झगडा शरीर विसर्जनापर्यन्त सुद्धा राहणे नैसर्गिक आहे.याच दृष्टीनें आपल्याला स्थितप्रज्ञाकडे पाहिले पाहिजे व म्हणूनच स्थितप्रज्ञाला सुद्धां जगांतील सर्वसाधारण लोकां-

प्रमाणें विविध कामें करतांना चैतन्याचा थेट खाली मातीपर्यन्त झालेला प्रवेश व पशूपक्षी, मानव वगैरे अखिल प्राणीमात्रामध्यें संस्कार, मन आणि बुद्धी ह्यातून दृगोच्चर होणारा त्याचा विलास अनुभवानें किंवा अभ्यासानें लक्षांत घ्यावा लागतो. ' व्यक्ति तितक्या प्रकृती ' ही म्हण तुला माहीत आहेच. विविध मनोवृत्तीच्या व बुद्धीच्या मानवांशी संबंध ठेऊन त्यांची वैशिष्ठ्यें लक्षांत घेऊन सर्वांशी समभावाने वागावे लागते. लोकसंग्रह करून नेहमीच व्यवहार करीत असतांना त्यांचेच बरोबर त्यांच्या मानसीक पातळीशी एकरुप होऊन त्यांची सामाजिक, आर्थिक राजकीय अशी परीस्थिती त्यांचेच दृष्टीनें बघावी लागते. तद्नंतरच स्थितप्रज्ञाचा Matter to spirit and sprit to matter हा अभ्यास पुरा होतो. परमेश्वरी ज्ञान झाल्यावर सुद्धा त्या ज्ञानातील बारकावे अनुभवानें समजावून घेतल्याशिवाय स्थितप्रज्ञाला सुद्धा परमेश्वराचा ज्ञान विलास बरोबर कळत नाहीं. वृक्षाच्या बीजांत संबंध वृक्ष साठविला आहे हे तात्विक दृष्ट्या खरें आहे. प्रत्यक्ष ज्ञानमय होऊन परमेश्वर बनण्याची स्थिति ही सुद्धा थोडीफार बिजांतून होणाऱ्या वृक्षाच्या उभारणी सारखी आहे यात काय ते समज. जोपर्यंत तुझे शरीर आहे तोपर्यंत तुला तुझी मन बुद्धी परमात्मस्वरूपांत सतत विलीन करून निव्वळ त्याच सच्चितानंद स्वरुपांत सतत राहता येणार नाहीं. एवढे खरें कीं मन बुद्धी परमात्मस्वरूपांत पूर्ण रंगल्यामुळें चैतन्याचे अनुसंधान डोळे न मिटता अहोरात्र तुला अनुभवता येईल, तरी देखील सर्व साधारण मानवाच्या मानसिक पातळी पर्यंत ( Level of Consciousness ) तुला हरघडी उतरावे लागेल. त्याचा कंटाळा करूं नकोस. त्यातच तुला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. त्यातूनच तुझ्या स्थितप्रज्ञतेची घडण एकसारखी घडत जाणार आहे. व त्यातूनच ज्ञानमय प्रभु स्वतः अलीप्त राहून पूर्ण अज्ञानमय अशा सृष्टीची कशी उत्पत्ती स्थिति व लय करतो त्याचे ज्ञान तुला प्राप्त होणार आहे. मन बुद्धीशिवाय कोणाही मानवाला जगांमध्ये कांहींच करता येणार नाहीं. बाह्यसुखापासून परावृत्त झालेली मनबुद्धी आपल्या भक्षावर तुटून पडलेल्या शार्दूलाप्रमाणें परमात्मसुखाचा उपभोग घेते, ह जरी खरे असले तरी देखील प्रयत्नानें तिला पुन्हा पुन्हा बाह्यवस्तुकडे कामापुरती तरी लावता आलीच पाहिजे. इतकेच नव्हे तर या भ्रममूलक विश्वाशी व त्यातील अनंत घडामोडीशी व त्यात हजारो मानवी मनानी उठविलेल्या विचार कल्पनेच्या वादळाशी समरस होऊन त्यातील आनंद घेऊन तो चाखता आला पाहीजे त्यांच जेथे हरीमय आहे तेथें, जगांत चाललेल्या विविध घडामोडीतला आनंद हा सुद्धा ईश्वरीच आनंद असला पाहिजे. त्याशिवाय परमानंदाची पूर्ण गोडी तुला चाखता येणार नाही. कर्मयोग्यांना इतर योग्यांपेक्षां समान

विश्ववंद्य मानतो ह्याचे कारण हेच आहे. तेव्हां ' योगः कर्मसु कौशल ' हा श्रीभगवंतांचा आदेश लक्षांत ठेवूनच तुला तुझे शेष आयुष्य काढले पाहिजे. या आयुष्यांत तूं अनंत स्वरुपाशी एकरुप झाला असल्यामुळें व्यवहार करताना सुद्धा तुला कोणतीच अडचण भासणार नाही. परमेश्वर अनुभूती सदैव तुझ्या अंतःकरणांत जागृत असल्यामुळें इतर व्यवहारी जनांसारखी तुला व्यवहाराची काळजी करावीच लागणार नाहीं. किंबहुना "ईश्वरी अनुभूती बरोबरच काळजी हा शब्द तुझ्या शब्दकोशातून उठूनच गेला आहे. तरी देखील काळजी सारखे कांहीसे कदाकाळी तुला तुझ्या मनांला संवयीमुळें झालें तर एखाद्या सुंदर वाजणाऱ्या वाद्यांमधून क्वचित बद्सूर निघतो तसे पृथ्वी आप, तेज वायू आणि आकाश या तुझ्या भोवतालच्या पंचमहाभूतांनी निर्माण केलेल्या आसमंतातून त्याना हलवित व कंपायमान करणारी अशी एक अनैसर्गीक वेदना थेट अनंत अंतःकरणाची सूत्रें आपल्याच हातांत ठेऊन ही सृष्टी चालवणाऱ्या अनंताच्या हृदयांत शिरते व तो लगबगीनें क्षणार्धांत, डोळ्याचे पाते लवते न लवते एवढ्या वेळांत ती काळजी सारखी कांहींशी मन स्थिति दूर करील 'तेषा नित्याभियुक्तानां योगक्षेम वहाम्यहम्' यातील योगक्षेमं ह्या शब्दाचा अर्थ व्यवहार आणि परमार्थ हा दोन्हीही आहे, हें नंतर पुरेपूर तुझ्या लक्षांत येईल. व्यवहार आणि परमार्थ यांचे अगदीं दोन अलग भाग करणारे जे लोक असतात त्यांना व्यवहार व परमार्थ दोन्हीही समजत नाहीत. व्यवहार आणि परमार्थ हे संलग्न आहेत. व म्हणूनच व्यवहारी माणसानें निदान आपला व्यवहार तरी बरोबर व्हावा म्हणून परमार्थाची कास धरणें आवश्यक आहे. मन बुद्धी मागें जाऊन परमार्थस्वरुपाचा अनुभव घेतलेली एखादी श्रेष्ठ विभूती जर सुदैवानें, अशा व्यवहारी माणसाला• भेटली तर त्याला ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचिती हृदयांत होण्यास वेळ लागणार नाही व हीच प्रचिती पुढें इतकी वाढते की त्यामुळे ईश्वरी अस्तित्वावर त्याची निस्सीम श्रद्धा बसते. व परमेश्वर आपले रोजचे व्यवहार चालवतो हा त्याला प्रतिक्षणीं अनुभव येऊं लागतो. त्यामुळें व्यवहारातील सर्व अडचणी दूर होऊन, चिंता काळजी वगैरे मनच्या स्थित्यांचा त्याला विसर पडू लागतो. व शेवटी व्यवहार व परमार्थ दोन्हीही त्यास सुखावहच होतात. सर्व साधारण बहुजन समाजाला हाच संदेश तूं सदैव देत रहा म्हणजे तूही कृतार्थ होऊन मलाही मी धन्य झालों असें वाटेल हीच तुझी माझी शेवटची भेट. यानंतर मी तुला कधी भेटेन हें नक्की सांगता येत नाहीं. तुझ्या कार्यांत परमेश्वर तुला यश देवो.

# सदाचार

—श्रीनिसर्गदत्त महाराज

**सध्यांच्या काळांतील एक साक्षात्कारी संत श्रीनिसर्गदत्त महाराज यांनीं आपल्या शिष्यांपुढें दिलेल्या एका प्रवचनाचा मथितार्थ आमच्या वाचकांसाठीं पुढें देण्यांत येत आहे.**

तिहीमाजी जें आहे।
तेंचि सत्य बिचारें पाहे।
एककाळीं एक आहे तें तें मिथ्या ॥
समाधी माजीं ध्येयभाव।
स्वानुभवें ज्ञात्यासी गोचर।
तिन्हीं अवस्थेचा केर ॥
तेथें नसे।

स्वानुभवें ज्ञात्यासी गोचर, स्वानुभवें ध्येयमात्र—वरील ओवींत तिन्हीं अवस्थांचे ज्ञान ज्यास कळतें, तें चढत वा ढळत नाहीं व त्याचे असणें त्याला कळत नाहीं. वेगवेगळ्या अवस्थेचा अनुभव त्या त्या अवस्थेबरोबर जातो. स्वप्नांतील अनुभव जागृतींत नसतो. बालपणींचे २२ वर्षांपर्यन्तचें अज्ञान. पुढें तारुण्यांतील ज्ञान, तरुणपणीं वेगवेगळ्या प्रकाराने वावरतें तेंच वृद्धापकाळीं पालटतें, अवस्थेबरोबर जातो. परंतु ज्याला हा अनुभव येतो. तो येत वा जात नाहीं. समाधि ही केवळ अवस्था सांगतात. त्या समाधींत—ज्याला ध्येय म्हणायचें आहे—त्याकरितां जपी तपी रामभक्त कृष्णभक्त भक्ति करतात, तें कोणाचें ब्रम्हाचे, कोणाचे बौद्धस्वरुप, कोणाचे श्रीहरिस्वरुप तर कोणाचें गुरुस्वरुप आहे. असें वेगवेगळे कां म्हणावें लागतें? उच्चारलेला शब्द व त्यावर विश्वास म्हणून प्रत्येक साधकांच्या त्या शब्दांवर विश्वास परंतु ध्येयांत बदल नाहीं. ध्येय एकच असतें. फक्त त्या ध्येयाचें वर्णन प्रकारानें, अनेक नामानें केलेलें असतें. त्या ध्येयाजवळ तिन्ही अवस्थांचा केरकचरा नाहीं. ज्ञात्यासी अनुभवे गोचर ध्येयमात्र तें आत्मस्वरूप आहे. अवस्थेच्या खालीं ओल ओलाव्याने असते. परंतु येणारा अनुभव तिळमात्र नसतो. जें कांहीं मिळावावयाचे आहे, ज्याकरीतां नाना तपश्चर्या करतात त्यास ध्येयम्हणणें आहे, मिळविणार ध्याता व ती क्रिया साधणें यास म्हणणें ध्यान ध्याता ध्येय साधतो. ध्याता हा अवस्थेपैकीं कोणीतरी अमका तमका; परंतु, ध्येय जें आहे तें अवस्थापूर्वींचें आहे. व तें तसेंच रहाते. शंकराचार्य येथें अवस्थेला

केरकचरा म्हणतात, अवस्थेंत मी अमका तमका तो तेथें ध्येयांत नाहीं. चराचर प्राणीमात्रांची उत्पत्ति, स्थितीलय अवस्थेंत होते. हें होण्यापूर्वी असणारें ध्येय व संपल्यावर असणारें ध्येय एकच आहे. ज्याला कळतें त्याला म्हणायचें ध्येय. समाधि शब्दाचा उल्लेख करून ध्येय कोणास म्हणतात, त्याचा अर्थ लागावा म्हणून त्यास ज्ञाता म्हटलें आहे. शब्द उमटतात व जातात. शब्द, अक्षरांबरोबर अवस्था उमटतात व जातात. परंतु जें ध्येय तें मात्र रहातें. रोजच्या व्यवहारांत तुम्हीं याचा विचार करा. कसलाच अनुभव नाहीं, त्या अनुभवाच्या खालीं हा ओलावा कसला ? तो कधींच आटत नाहीं. तुम्हांला पूर्ण समाधि साधली तर हा अनुभव येईल, नाहींतर कधींच साधणार नाहीं, असें मात्र नाहीं, परंतु आपले म्हणून केवळ ज्ञान तें ज्यावर उमटतें तें ध्येयमात्र ज्ञात्यास कळतें.

### ज्ञानियांचा राजा

असा अन्वय व्यतिरेक करुनि जाणावा तिन्हीं अवस्था तेथें नाहींत, जें ज्ञात्यासी गोचर तें ध्येयमात्र हा व्यतिरेक झाला. अवस्था वजा झालेल्या जो पहातो, तो या सर्वज्ञान व ज्ञानियांचा राजा. जागृती हें ज्ञान, झोंप हें ज्ञान व स्वप्न हेंहि ज्ञान. ज्यांचा अर्थ लागतो, तें सर्व ज्ञान. परंतु तें स्व-रुपज्ञान मात्र नव्हे, तें ज्ञात्यासारखें चिरकाल, सुखमय असें नव्हे. जरी असें आहे, तरी तो ज्ञाता स्वानुभवें गोचर म्हणजे आपल्याच अनुभवें आपणांस दिसणारा—जागृति अवस्था सोडा ती गेली. खालीं असलेला ओलावा वर आलेला आहे. सगळयांत भरून उर्ध्व दिसतो काय ? ज्ञात्यासी गोचर स्वानुभवें ध्येय. तो सर्वांत भरून मिथ्या कल्पनेनें उरला आहे. राहू जसा सूर्यास स्पर्श न करितां ग्रासतो, तसाच हा एका अहं राहूनें—नसत्याच कल्पनेनें ग्रासला आहे. हा देह अहंकार रावण आहे, परंतु देहअलंकार म्हणजे आत्मअहंकार नव्हे, तो अहं-राहू म्हणूनच राहिला आहे. तो केवळ कल्पनामात्र आहे. त्याचा सदुपयोग वा दुरुपयोग नाहीं, पूर्वी व अंतीं स्वानुभवें जें गोचर तें रहातें. परंतु जो अहंकार दोन स्मरणानें ( स्त्री वा पुरुष ) आहे, त्यालाहि भेदून जो आहे चिरायु आहे. त्यास नसत्याच कल्पनेनें ग्रासलेलें आहे.

### राहू आणि केतू

सूर्याला वास्तविक राहू ग्रासतच नाहीं. परंतु लोककल्पना मात्र तशी आहे. मग त्या कल्पनेचा निरास होण्यांकरितां सुवर्ण असले, तर सुवर्णांचें दान, ताम्रदान वस्त्रदान करा, वगैरे सांगतात. एवढें करूनहि त्या सूर्यास मुक्त करण्याकरितां समुद्रावर जाऊन स्नान करावयास सांगतात. तसेंच हें देहरूपी ग्रहण सुटण्यांकरितां तुम्हीं तुमच्या सहीत दान करा. हा नसताच अहंकार ( देहाहंकार ) आहे तो दान करणें आहे, म्हणजे त्याच्याच प्रकाशाचाच आधार घेऊन त्याचें दान करणें, त्यानें हा देह अहंकार

सुटतो. देह हें आपुलें ( स्वतःचें ) परमात्मस्वरूप नव्हे. जें सदासर्वदा सारखेंच असतें. तें परमात्मस्वरूप. जें घटकाभर असतें तें अनात्मस्वरूप. आपण देह नव्हे म्हणून गुरुवचनाप्रमाणें आपला सर्व अनुभव खरडून काढावा, मग अनुभवीयांनां तो स्वानुभवें उरला, तो ढळटळीत आहे. पण त्यावर जे दोन आरोप राहू वा केतू—हे दोन्हींहि गेले पाहिजेत कारण ते मुळांतच नाहींत, ते दिसतच नाहींत.

लाखों रुपये कमविणाऱ्या जीवाचें शरीर ( तो मृत्यु पावल्यावर ) आणखी कांहीं दिवस कोणी ठेवूं म्हणेल, तर घात होतो, कारण ध्येयमात्र जें स्वानुभवें गोचर त्याचा त्यांत अभाव झाला अनुभवें जें गोचर तें कानाच्या मागे म्हणजे शब्दाच्या मागे म्हणजे आकाशाच्या मागे. कारण शब्दगुण हा आकाशाचा. मागे म्हणजे आधीं. हें काय आहे ? ज्याला हें सगळें कळतें अशा जातीचें तें आहे, त्यास कळलें नसतें तर हालचाल झाली नसती. आतां तुमच्या कानाच्या पोकळींतून, शब्दाच्या पोटांतून आकाशांत भरलेले आहे.—आम्हीं—जें काय म्हणतों, त्याचा अर्थ आकाशांत भरतो।

## गुरुवचनाचें पालन

आकाशाच्या बाहेर राहून जाणते तें कोण ? ज्याला या ध्वनीचा अर्थ कळतो तें अन्वयीं तें कसें आहे. हा उल्लेख देण्याचा अर्थ आहे. शब्द कानांत पडतो. त्या शब्दाचा अर्थ आहे, तो शब्द आकाश एकत्र आहे. कोणताहि शब्द मोकळें, अभिन्न असें आकाश आहे. आकाश तेथें शब्द व अवकाश तेथें ध्वनी. परंतु याचा अनुभव कोणास येतो ? आकाशाच्या पूर्वी ज्याला अनुभव येतो, व अनुभव म्हणजे ज्ञान, ज्ञान काळाचें, आकाशाचें वगैरे आहे. या ज्ञानास जाणतें तें कोण ? तर तेंच तुम्ही आहांत. तुम्हीं म्हणजे नव्हे कोणी व कशासारखा. परंतु हा अहंकार मात्र तुम्हीं आपला मानतां. शरीराच्या ओळखीप्रमाणें आम्हीं राहूं असा तुमचा संकल्प झाला आहे. परंतु तो कांहीं केल्या जाणार नाहीं. तो फक्त गुरुवचन पालन केल्यानेंच जाईल. आकाशाचें ज्ञान जाणत्याला आहे. म्हणून शब्दाचें ज्ञान आहे. शब्द वाट चालूं लागला कीं वायू, तो ( वायू ) अगदीं घाई घाईनें चालू लागला कीं त्याचेंच रुपांतर विजेत होते. शब्दच प्राण, शब्दच वायु आहे, घाई घाईनें चालूं लागल्यावर उष्णता बनून तेज झालें, घाम सुटला कीं मेघमेघांतून पर्जन्यरूपानें खाली उतरतो. आतां आम्हीं ज्याचा उल्लेख घेतो तो समाधीच्या खालीं आहे, पण तोगुण नाहीं, तो तळाशीं आहे. त्यास सर्वभाषा कळतात, पण राहूला असा अनुभव येत नाहीं. सर्वस्व जें कांहीं तें ज्ञात्याचें स्वरूप पण ज्ञाता व तुम्हीं म्हणजे कोणी वेगळें नाहीं.

## त्रिगुणाचार्य

तें प्रत्येक अवस्थेंत कलंकरहित आहे. म्हणजे त्यास कोणताही डाग लागत

नाहीं. त्यास साक्षीत्व घडतें, परंतु ते साक्षीत्व करूं जात नाहीं. साक्षीत्वाचा डाग त्यास स्पर्श करूं शकत नाहीं. तुम्हीं असल्याचें साक्षीत्व मात्र तें करतें. तुम्हीं असल्याचा पुरवार करणारा हा अहं राहू आहे. जो वस्तुतः नाहींच पण तोच मी हें सर्व करतों, असें म्हणतों. तुमच्या संसाराचा एकूण अनुभव त्याला जरी येतो तरी त्याचा दोष लागत नाहीं. काल उल्लेख दिला होता कीं, हा जो बुद्धिप्रकाश त्यावर अहंभावाचा ठसा उमटून त्यांत दोन जाती (स्त्री आणि पुरुष) आहेत. कांहीं तरी विकृतीमुळें किंवा कांहीं कारणपरत्वें बुद्धिभ्रंश केला तर त्यास शरीराचा कापलेल्या भागाचा दुखावा जाणत नाहीं. आत्मा सर्वांत सारखा कसा? सगळ्या नाड्या कापून परत व्यवस्थित केल्या तरीही आत्म्यास त्याची कांहींहि हानी वा लाभ नाहीं, देही परमात्मा विदेही कसा आहे? शरीरांत वावरत असतांनाहि हानि, लाभ, मृत्यु, पाप–पुण्याचा स्पर्श आत्म्यास होत नाहीं. शुद्धीवर आल्यावर मी बाई अथवा बाबा (स्त्री वा पुरुष) असा अहंकार येतो, मग योग्य पूर्णपणें शुद्धीवर आल्यावर तो देहअहंकार घाबरला. (आपला कांहीं शरीराचा भाग कापला या जाणीवेनें) परंतु एवढें होत असतानाहि ज्याची समाधि भंग पावत नाहीं. तो ज्ञानराज भगवान आहे. ऑपरेशनच्या वेळीं जसा होता तसाच आतां आहे. परंतु देहअहंकाराची अभिमान अवस्था तीच आतां अधिक आहे. ती देह अभिमान अवस्था जर थोडीशी बाद केली, तर मग तो सगुण कीं निर्गुण? त्याचा वेध कसा आहे! तो पंचतत्वावेगळा आहे. हें एक ढोबळ ओळखीचें लक्षण. याच्याहि पुढें एक विमलस्वरूप आहे. येथें तो त्रिगुण आचार्य आहे. त्रिगुण आचरण करीत असतानां त्यास नफा तोटा नाहीं. याच्याहि पलीकडे, ज्यास आम्हीं सद्‌गुरु म्हणतो. त्याची वस्ती या त्रिगुणांपलिकडे आहे. ह्यालाच नामदेवाचा पांडुरंग, तुकारामाचा विठ्ठल म्हणा. श्रीहरि म्हणा. प्रत्येकाची अक्षरें वेगळी, पण ध्येय एकच. तरी पण त्रिगुण आचरण करीत असणारा त्रिगुण आचार्य आहे.

तुम्हीं एक प्रतिज्ञा पक्की आठवण घ्या कीं हें व्यवहारज्ञान व आपला कांहीं संबंध नाहीं. तुम्हीं व्यवहार कमी करा, असें परमात्मा कधींच सांगत नाहीं. तर फक्त त्यांत सत्य नित्य काय तें पहा, आपण काय तें पहा. बुद्धीच्या अलिकडे तुम्हीं बुद्धि जागृतींत आल्यानंतर जाणवते तें तुम्हीं नव्हें.

### वेदांची शिकवण

आत्मा बुद्धिपलिकडे आहे, असें वेद शास्त्रें सांगतात, बुद्धीच्या अलिकडे आपण अमका तमका हा अभिप्राय खोटा आहे. अमका तमका आपण असा अभिप्राय न घेतां जें वाजवी आहे, तें बिलकूल, ज्ञानरूप आहे, परंतु तें नव्हें स्त्री वा पुरुष. ज्ञानस्वरूप (अभिमान) आपण हा बाजवी अभिप्राय आहे, व तोच

तुम्हीं घ्या. तो घेऊन जागृतींत तुम्हीं अमका वेष, प्रसंग या नात्यानें व्यवहार करतां तो खुशाल करा, परंतु हा जो आंतील अभिमान ( अभिप्राय ) अद्‌भुत आहे, तो विसरूं नका. तो अगोदर आहे. तो अगोदर आहे. तेंच अगोदर गोचर आहे व त्यावर तुम्हीं कांहीं तरी आहांत ( अमका तमका असें ) हे न घेणें तुम्हीं हें तुमचें देहभावाचें असणें विवेकानें बाजूला केलेत, तर तुम्हीं कोणीहि नाहीं. मग चारी अवस्थांत वावरणारे ज्ञान, स्त्री वा पुरुषांत असणारे ज्ञान, गुणांतहि ज्ञान, निर्गुणांतहि ज्ञान आहे. अशी ओळख पटून ज्याला ठेवली आहे, त्याला जाणीवेच्या दुःखाची हाय हाय नाहीं, मोकळया जाणीवेलाच कोणी देव म्हणतात, कोणी अल्ला तर खिस्त म्हणतात.

## तुकोबाचा अनुभव

जसें आकाशांत ध्वज-धूळ, घाण जात असूनहि आकाश शुद्ध आहे, तसेंच हा आत्मा विकारांत असूनहि त्यापासून अलिप्त म्हणजे त्यास विकाराचा स्पर्श नाहीं. तसें केवळ शुब्दें सुचविले. कोणाला ? जाणत्याला. हा शब्द आहे. जो ऐकूं न जातां जाणतो, त्यास सुचविलें. त्याला जेव्हां आपण असल्याचे जाणवते तेव्हां त्यांत ( जाणीवेंत ) आकाश व आकाशांत सर्व गोष्टी आहेत. तो असल्याचें त्यास जेव्हां जाणवते ? त्या जाणींवेंत आकाश आहे, म्हणून हा बुद्धिवरचा नागोबा तुकारामाने बाजूला केल्यावर आंत असलेला पांडुरंग स्पष्ट झाला. मग तुकाराम नाहीं. नाहींपणें निमाला. तुकारामाचें मरण पांडुरंगानें पाहिलें. जाणीवेचें नांव पांडुरंग, विठोबा. जाणीवेच्या पोटांत आकाश व आकाशाच्या पोटी सर्व प्राणीमात्र आहेत. म्हणून तुकारामाचा अनुभव जेव्हां नव्हते आकाशवाणी तेव्हां होते निरंजनी असा झाला. आपण अमका तमका हा भास दोरीवरचा साप जणूं मारला. दोरी ही आकृतीची रेषा मानिली. व त्या रेषेवरील अभिमान म्हणून दोरीवरचा साप आहे. वास्तविक दोरी म्हणजे साप नव्हे. दोरी कधींहि साप झाली नाहीं. दोरी साप होत नाही.

जसें त्रिगुण आहे, त्यास अमके तमके न म्हणायचें म्हणून तुकारामानीं त्यांस पांडुरंग म्हटलें. परंतु हळूं हळूं पाहतां आकाशापेक्षां पोकळ असें दर्शन त्यास झाले. मग शब्दें सुचविलें कोणाला नाहीं, नाहींपणें गेला. मग आंत मध्यें जो तो स्वगुणब्रह्म सगुण ब्रह्म, विठ्ठल—या विठ्ठलाचें दर्शन कोणाला घडतें ? आकाशाच्या पूर्वी जें आपण त्यास ही ओळख पडते, हीच ती निरंजनवनांत तीं ग्वाही म्हणजे बातमी, गाई म्हणजे गाते ती. निरंजनींवनीं देखीली मी गाय ( गाई ) हा पांडुरंग, विठोबा. जो नाहीं म्हणून काढून टाकला तो आकाशाचा बाप त्यास वडील

# प्रेरणा व जागृति

************************

लेखक : **एक साधक**

मागें ऋषि संतों मात सांगितली ।
माझी मज केली वाचा तैसी ॥

—तुकाराम.

सूर्य अस्तास चालला आहे, सायंकाळची छाया पडत आहे, आकाशांतील तारे उगवण्याचा समय झाला आहे, हवेमध्यें स्तब्धता नांदत आहे, पक्षी आपल्या घरट्यांकडे जात आहेत, अशा ह्या गंभीर वेळीं आपल्या अंतःकरणामध्यें एक विलक्षण प्रकारची तळमळ सुरू होते, नित्याच्या व्यवहारांतून एकदां मोकळें झाल्यावर, आपण आपल्या स्वतःशींच विचार करूं लागतांच, ही जी अस्वस्थता जाणवते, जी तळमळ सुरू होते, तिचा अर्थ आपण कसा काय करतां तो मला सांगतां येत नाहीं. पण मला वाटतें कीं, ज्याच्यापासून आपण निर्माण झालों, ज्याच्यामध्यें आपण रहातों, व ज्याच्यापासूनच आपल्या मनाला शांति मिळणार आहे अशा महान, शाश्वत व पवित्र परमात्म्याकडे आपली दृष्टि वळवा असा या वृत्तीच्या योगें आपणांस बोध होत असतो.

**मिलेट** नांवाच्या एका प्रसिद्ध फ्रेंच चित्रकारानें काढलेल्या '**अँगेलस**' या चित्राची आठवण मला अशा या वेळीं होते. सायंकाळसमयाच्या देखाव्यांचें व

---

होऊन बसला. मग तुकाराम म्हणतात, सकळ देवाचें दैवत उभा असें पारंगत. लोक त्यास तुकाराम म्हणून ओळखतात. परंतु तुकाराम स्वतःस ( अंतर्यामीं ) विठोबा म्हणूनच पहातात.

**विश्वास हुडका**

सर्व विद्येनें, कलेनें, सामर्थ्यानें हा श्रीरंग परिपूर्ण आहे. कोणत्याहि कलेंत वा विद्येंत मागें आहे, असें नाहीं. आतां पलिकडे जाऊन बसला त्यास आपण असल्याचें कळतें.

तुम्हांला शब्दानें सुचविलें परंतु हे जर तुमच्या लक्षांत राहिलें तर कोणत्याहि आठवणीनें रहा व संसार आणखी करा पण त्याआधीं विश्वांसांतील विश्वास हुडका.

सत्य जें आहे, ते आपल्या पराक्रमानें परिपूर्ण, भक्तीनें परिपूर्ण कलेंत कलापूर्ण आहे, म्हणून आज सुचविल्याप्रमाणें ही आठवण आठवणीनें जागृत करा.

---

शेतकऱ्याच्या आयुष्यक्रमाचें हें जें हुबेहुब चित्र त्या कारागिरानें वठविलें आहे त्यामुळें पुष्कळ लोकांचें लक्ष उपासनेकडे लागलें आहे. त्या चित्रामध्यें असें दाखविलें आहे कीं, एक गरीब शेतकरी व त्याची बायको यांनीं शेतामध्यें दिवसभर आपलें काम केल्यानंतर सूर्यास्ताचे वेळीं हात जोडून विनम्र-भावानें उघड्या जागेंत तीं उभीं राहून ईश्वराच्या चिंतनामध्यें मग्न आहेत. तीं साधीं भोळीं, गरीब, व नम्र अशीं माणसें खरीं, पण त्यांचें परस्परां-वरील निष्कपट प्रेम, परमेश्वरावरील विश्वास, त्यांची निस्सीम भक्ति ह्यायोगें त्यांच्या मुखावरील तेजानें जणूं काय त्यांच्या भोंवतालचा प्रदेश प्रकाशमान होत असे. ईश्वरी इच्छा प्रमाण मानावयाची अशी त्यांची वृत्ति आहे. पण त्या चित्रामध्यें असेंही दर्शविलें आहे कीं, आयुष्यामध्यें त्यांना कितीहि कष्ट करावे लागोत किंवा त्यांच्यावर कितीही संकटें येवोत तीं सहन करण्यास ईश्वराच्या कृपेमुळें व वात्सल्यामुळें त्यांच्यांमध्यें एक प्रकारचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे, याची जाणीव त्यांना आहे.

या चित्राची आठवण होऊन पुष्कळ वेळां माझ्या मनाला आनंद झाला आहे, समा-धान वाटलें आहे व हें सर्व जग सारखें आहे, मनुष्याची उन्नति होते ती त्याच्या विव-क्षित कामधंद्यामुळें नव्हे तर त्याचा तो कामधंदा किती कां कनिष्ठ प्रतिचा असेना, तो आनंदाच्या व उत्साहाच्या वृत्तीनें केला असतां निरंतर सुंदर व वरिष्ठ दर्जाचा समजला जातो, याची माझ्यामध्यें जागृति उत्पन्न झाली आहे. ईश्वराची प्रार्थना केल्यानें, त्याची पूजा केल्यानें व त्याचें मनन केल्यानें मनुष्यामधील ईश्वरी अंश उदित होतो व ज्या ज्या ठिकाणीं म्हणून ईश्वरी अंश आपणांस आढळतो त्या त्या ठिकाणीं त्यापुढें आपली वृत्ति नम्र करून त्याची पूजा आपल्या हातून सहज घडते.

एखाद्या सुंदर चित्रामध्यें किंवा कवितेमध्यें आपल्यामधील कांहीं मनोवृत्ति जागृत करण्याचें सामर्थ्य असतें हें आपल्यापैकी सर्वांच्या कधींना कधीं तरी लक्षांत आलेंलें असेलच. तें चित्र आपल्या समोर आहे तोंपर्यंत किंवा ती कविता आपण वाचीत आहों तोंपर्यंत आपल्या मनोवृत्ति जागृत होत असतात असें नव्हे, तर त्या चित्राची किंवा त्या कवितेची नुसती आठवण झाल्यानेंहि पूर्वीं आपणास आपल्या मनोवृत्तीचा जितका वेग भासतो तितकाच आठवण झाल्यावरहि भासतो.

एकाद्या सुंदर पदार्थाच्या योगें नेहमी आनंद उत्पन्न होत असतो, आणि या आनंदामुळें आपल्या आत्म्याचें पोषण होतें. एखाद्या कवीची किंवा एखाद्या चित्र-काराची आपणांवर एवढी छाप बसते, याचें रहस्य काय बरें ? कित्येक जण असें म्हणतील कीं, त्यांच्यामध्यें कल्पकबुद्धि असते म्हणून त्यांना त्या बुद्धीच्या योगें आपणांवर अम्मल चालवितां येतो. परंतु हें त्याचें पुरेसें स्पष्टीकरण झालें असें मला वाटत नाहीं. **मिलेटनें** आपल्या चित्रामध्यें काढलेला देखावा कोणत्या ना कोणत्या

तरी रूपानें आपल्याइकडील शेतामध्यें कोणालाही दिसून येईल. परंतु आपल्या पहाण्यामध्यें आणि **मिलेट**च्या पहाण्यामध्यें फरक जो आहे तो हा. त्या देखाव्याकडे पाहून आपल्या अंतःकरणांत तात्पुरती प्रेरणा उत्पन्न होते आणि नंतर त्याविषयीं आपणास कांहींसुद्धां आठवण राहत नाहीं. परंतु जो देखावा पाहून **मिलेट**च्या अंतःकरणामध्यें कौटुंबिक प्रेम, पावित्र्य, शेतामध्यें काम करणाऱ्या, पतिपत्नि या नात्यानें बद्ध झालेल्या दोन व्यक्ति यांचें परस्पराशीं वर्तन व आपल्या उत्पन्नकर्त्याविषयीं आदर या गोष्टी खऱ्या रीतीनें जागृत झाल्या; व आपणांस जो आनंद वाटला त्याचा वांटा दुसऱ्यांसही मिळावा अशी त्याला उत्कट इच्छा उत्पन्न झाली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इतक्या दूरवर व इतक्या पुष्कळ दिवसांनीं त्या चित्राचा आपणांवर येथें परिणाम होतच आहे त्याचें कारण म्हणजे त्या चित्रकाराच्या अंतःकरणांत खरें प्रेम, सत्य व खरी आस्था होती हें होय.

तुकोबांच्या अभंगांविषयींही असेंच म्हणतां येईल. तुकोबांचा ईश्वरावर पूर्ण विश्वास होता. मनुष्यामात्राविषयीं ईश्वराच्या ठिकाणीं असलेल्या प्रेमाची त्यांना पूर्ण जाणीव होती. मनुष्य सतत ईश्वराच्या समागमांत राहिल्यानें त्याला किती आनंद प्राप्त होतो हें त्यांना स्वानुभवावरून माहीत होतें. जो आनंद प्राप्त करून घेणें खरोखर प्रत्येकाचा उपजत हक्क आहे त्या आनंदाचा वांटा दुसऱ्यानाही मिळावा अशी त्यांची इच्छा असे म्हणून मोठ्या प्रेमानें त्यांनी आपले अभंग आपणांकरितां मागें ठेविले आहेत. ते अभंग आपण जेव्हां घोळून घोळून म्हणतों,त्यांचा अर्थ लक्षांत घेतों व त्यांवर विचार करितों त्या वेळीं मनुष्यमात्रावर तुकोबांचें प्रेम कसें होतें; त्याची सत्यनिष्ठा कशी प्रखर होती, याचा आपणास प्रत्यक्ष अनुभव येतो. तुकोबांची तरफदारी करण्यासाठी मी हे सांगत आहें असें नव्हे तर तेच म्हणतातः—

**मागें ऋषि संतीं मात सांगितली ।**
**माझी मज केली वाचा तैसी ॥**

याचा अर्थ इतकाच कीं पूर्वीच्या ऋषींनीं जें कांहीं सांगितलें तें मला इतकें पटलें कीं तेंच मी आपणांस निवेदन करितों. मी जें कांहीं सांगतों, माझेजवळ जें कांहीं आहे तें, व स्वतः मीही त्यांचा आहे. त्यांनींच सत्याचा उगम, आनंदाचा सागर जो परमात्मा त्याच्या सन्निध मला नेलें व मग त्यांच्याच प्रेरणेनें माझ्या ठिकाणीं स्फूर्ति उदित झाली. तुकोबा ऋषींचीं वचनें ऐकून मान डोलावीत नसत. ते तीं आपलीशीं करीत व मग आपल्या शब्दांनीं तींच वचनें तींच तत्त्वें ते जनास सादर करीत.

मी पूर्वी एके प्रसंगीं सांगितलें आहे कीं, कोणी एका ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं प्रेरणा हा मेहनतीचा परिणाम होय, म्हणजे एकाद्या चांगल्या कल्पनेविषयीं सतत विचार केल्यानें व तदनुरूप आचरण ठेवल्यानें प्रेरणा उत्पन्न होते. हेंच सत्य, 'Practice makes perfect म्हणीमध्येंही आहे. परंतु आपणांत प्रेरणा उत्पन्न होत नाहीं, कारण घाम येण्याइतके आपण श्रम करीत नाहीं, आणि यदाकदाचित् केले तर क्षणभरच म्हणून आपल्या घामाची वाफ होऊन निघून जाते, म्हणजे जेव्हां चांगली व पवित्र कल्पना आपल्या मनांत येते तेव्हां तिचा आपल्या अंतःकरणावर कांहीं परिणाम आपण होऊं देत नाहीं किंवा जर होऊं दिलाच तर तो फारच थोडा वेळ टिकणारा असतो. आपण तिला चिकटून राहून ती आपलीशीं न केल्यामुळें ती आपल्यामधून नाहींशी होते व आपण पुन्हां कोरडे ते कोरडेच !

आपण आपल्या स्वतःशीं थोडा विचार केला, थोडें आत्मपरीक्षण केलें तर आपणांस हें कळून येईल कीं, आपली बुद्धि कशी का असेना आपल्यांपैकीं प्रत्येकाच्या अंतःकरणांत एकाद्या चांगल्या कल्पनेमुळें किंवा चांगल्या विचारामुळें थोडीबहुत जागृति उत्पन्न होऊन तें कमी अधिक प्रमाणानें उन्नत होतें. वेडा असल्यास गोष्ट निराळी, पण प्रत्येक मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, जगामध्यें जें चांगलें आहे, पवित्र आहे, तें पाहिल्यानें, ऐकल्यानें किंवा त्याचे विषयीं वाचल्यानें, त्याजविषयीं त्याला कौतुक वाटतें व तो त्याजवर प्रेम करूं लागतो; मग त्याची धारणाशक्ति कोणत्याही दर्जाची असो. हा मनुष्यस्वभावाचा एक प्रकार आहे. एकादें शौर्याचें कृत्य पाहून, एकादें मधुर गाणें ऐकून, एकादें अप्रतिम काव्य वाचून किंवा सृष्टिसौंदर्य पाहून, कित्येकांच्या अंतःकरणामध्यें वर सांगितलेली उपजत बुद्धि अधिक स्पष्ट रीतीनें दृष्टोत्पत्तीस येते. परंतु या सर्व प्रसंगीं मनुष्याची दैविक शक्ति त्याच्या अंतःकरणामध्यें जागृत होते' ती इतकी कीं त्याच्या अंतःकरणांत जणुं काय कांहीं शाश्वत तत्वाचाच उदय झालेला आहे असें वाटतें.


आपल्यामध्यें व सत्पुरुषामध्यें फरक जो आहे तो हा कीं सत्पुरुष अशा वृत्तींशीं तन्मय होऊन जातो, त्यांच्याशीं सख्य करतो. त्यांच्याशीं तादात्म्य पावतो आणि त्यामुळें त्याचें मन व अंतःकरण उन्नत होतें. म्हणून आनंद, शांति व प्रगल्भ विचार त्याचे ठिकाणीं वास करितात. आमच्या अंतःकरणांमध्यें अशा प्रकारच्या वृत्ति जेव्हां उदित होतात तेव्हां आमची पूर्व तयारी नसल्यामुळें कांहीं उपयोग होत नाहीं. आम्ही त्यांचेविषयीं कांहीं विचार करीत नाहीं. मग परिणाम असा होतो कीं, आपलें मन त्या वृत्तींस पारखें होतें, आळसाने आपण त्यांची हयगय व बेपर्वा केल्यामुळें व विषय सुखांतच लोळत राहिल्यामुळे अशा प्रसंगाचा आपणांस कांहीं उपयोग होत नाहीं.

पहा, प्रेमाचें भाषण, उदात्त कल्पना किंवा सत्कृत्य यांयोगें ज्याचे मनास चैतन्य उपन्न होऊन तें उन्नत झालें नाहीं असा या ठिकाणी कोणीतरी आहे काय ? प्रत्येकाच्या मनामध्यें अशायोगें जागृतीही होणारच. जें चांगलें, जें पवित्र आहें, जें सत्य आहे व जें प्रेममय आहे त्याजविषयीं आपल्या मनांत पूज्यबुद्धी साहाजिकच उपन्न होणार. अशा प्रकारची वृत्ति जेव्हां आपल्यामध्यें उदित होते तेव्हां त्या वृत्तीस अनुसरून आपलें आचारण ठेवावें अशी ईश्वराची आपणास आज्ञा होत आहे असें आपण समजावें. परंतु आम्ही इतके सुस्त बनलो आहों कीं, समुद्रांतील लाटांच्या तरंगा-प्रमाणें वरील प्रकारची वृत्ति क्षणीक आमची होते न होते तोच ती निघून जाते. कारण आम्ही चिकटून रहात नाहीं. परंतु साधु पुरुषाची गोष्ट तशी नव्हते. सात्विक वृत्तीचा एकदां कां त्यांच्या अंतःकरणांत प्रकाश पडला म्हणजे मग सतत अभ्यासानें ते ती कायम ठेवतात आणि मग तो म्हणजे त्यांचा स्वभावच बनून जातो. त्यांना जी गोष्ट शक्य ती दुसऱ्या प्रत्येकास शक्य असलीच पाहिजे. तुकोबा-प्रमाणें आपणांस अभंग रचता येणार नाहींत किंवा त्यांच्या प्रमाणें साधू बनतां येणार नाहीं, परंतु, आपले पूर्वज जे ऋषी त्यांच्या उदात्त कल्पना, उदात्त हेतु व हृदयास हालवून सोडणारे विचार लक्षांत घेऊन त्याप्रमाणे आपलें आचरण ठेविलें, सतत अशाच गोष्टींचें अध्ययन केलें, मनन केलें तर आपण सत्यशील माणसें झाल्यावांचून राहणार नाहीं. असें झालें असतां देशाचा भाग्योदय होईल. कारण, ज्यांनीं असत्याचा त्याग करून सत्याचा आश्रय केला आहे अशाच व्यक्तीकडून सर्व सुधारणा झाली पाहिजे.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# देवावर भार कशासाठीं ?

## तोच संकटमुक्त करणार आहे

कृपावंत किती । दीनें बहु आवडती ॥ १ ॥
त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेम चिंता ॥ २ ॥
भुलों नेदी वाट । करीं धरुनि दावी नीट ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवें । अनुसरतां एका भावें ॥ ४ ॥

या तुकारामबावांच्या उक्तीप्रमाणें त्यांचा दुसरा एक अभंग आहे तो असा:—

आलिया भोगासी असावें सादर ।
देवावरी भार घालूनियां ॥ १ ॥
मग तो कृपासिंधु निवारी सांकडें ।
येर तें बापुडे काय रंक ॥ २ ॥
भवाचिये पोटीं दुःखाचिया राशि ।
शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे काय करितां ।
चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

'यांत देवावरी भार घालूनियां' बद्दल 'देवावरी भार घालूं नये' असा क्वचित् पाठ आहे; पण तो अशुद्ध आहे. कारण, देवावर भरिभार ठेवून त्याच्यावर भार घालणें, हाच खऱ्या भक्ताचा मार्ग असतो. तुकारामबावा म्हणतात कीं, देवाला दीन फार प्रिय आहेत आणि त्यांचा योगक्षेम तो चालवित असतो. पूर्वीचे राजे अथवा त्यांचे मोठे कामगार जमीन बर्षासन, किंवा नेमणूक यांची सनद करून देतांना योगक्षेम चालण्यासाठीं, हे शब्द वापरीत असत; आणि त्यांचा अर्थ खाण्यापिण्याच्या वस्त्रप्रावरणाच्या, अन्नाच्छादनाच्या व साधारण घरसंसाराच्या संबंधानें सुखानें राहण्यासाठीं, हाच असतो. परमेश्वर दीनांच्या योगक्षेमाचा भार आपल्या माथीं वाहतो त्यास मार्ग दिसत नाहींसा झाला म्हणजे वाट चुकूं नये म्हणून हातानें धरून नेतो आणि ती दाखवितो. परंतु एक अट आहे, ती कोणती म्हणाल तर जें जीवें व एकभावें त्यास अनुसरतात, त्यांसच असा अनुभव येत असतो.

आतां देवाला दीन फार आवडतात, या म्हणण्याला एक आक्षेप आहे तो हा कीं, पर्वताच्या वरच्या प्रदेशापेक्षां खालच्या भागाला सूर्याची ज्योति उशिरां पोहोंचते;

आणि सामान्यतः ज्या मनुष्यांस बल, सत्ता, ज्ञान अथवा द्रव्य यांची अनुकूलता अधिक असते त्याची जतन व जोपासना विशेष होत असते; यावरून सृष्टिमहात्मामध्यें व मनुष्यसृष्टींत हा नियम नाहीं, हे उघड आहे. मग धर्ममार्गांतच कोठून आणतां? आपणांमध्यें आंधळे, पांगळे व लुले यांचा भार घेणारे असतात, असा साधारण अनुभव नाहीं; तर देवाला दीन फार आवडतात, आणि तो त्यांचा योगक्षेम चालवितो, हें खरें कचावरून? ही गोष्ट अनुभवाला येत नाहीं, असें वरवर पाहणाराला वाटलें, तर फारसें नवल नाहीं. आंधळे पांगळे हे आमच्या समजुतीनें दीन असले, तरी त्यांच्या स्वतःच्या किंवा देवाच्या दृष्टीनें दीन असतातच असें नाहीं. आपलें सर्व गौरव, आपला मोठेपणा, व स्वयप्रकाशाची प्रौढी एकीकडे ठेवून जे एका भावानें देवाला अनुसरले ते जन राजासारखे ऐश्वर्यवान् असले, तरी तेच धर्ममार्गांतले खरे दीन समजावयाचे; आणि तुकारामबाबांचें म्हणणें त्यांनाच लागू आहे. आपल्या मनानें, ज्यांच्यामध्यें कांहीं कमीपणा आहे ते दीन, असें म्हणण्याचा प्रघात आहे; तरी त्यांस अनुलक्षून ही उक्ति नाहीं. आपले ऐहिक ऐश्वर्य, आपला प्रभाव, आपलें शहाणपण कितीही असलें, तरी आपण दुर्बल, परमेश्वरी सत्तेच्या सर्वपरी अधीन असें समजून, देवाला अनन्य-भावानें जें शरण जातात आणि त्याच्या इच्छेस अनुसरतात तेच खरे दीन. ते देवाला आवडतात; त्यांचें ओझें तें कसलें, आणि त्यांस वाट चुकण्याची भीति ती कोठें राहते? धर्ममार्गांतल्या दीनाचीं हीं दोन लक्षणें आहेत. ज्याच्या घरीं ऋद्धिसिद्धि पाणी वाहतात असे सिद्ध व जे आपल्या धर्मकर्मांनीं आपला उद्धार करूं शकतात असे साध्य, यांतला एकही दीन नव्हे. ज्याला ओझ्याचा भार दुःसह वाटतो आणि चुकण्याची भीति फार असते असा साधकस्थितींतला दीन मनुष्य अनन्यभावानें देवाला शरण गेला असतां त्याची त्याला कींव येते; त्याचें देव रक्षण व तारण करितो. साध्यांची व सिद्धांचीं सृष्टीस आलाहिदा आहे. याउप्पर कोणी म्हणतील कीं, आम्ही याच स्थितींतले आहोत आणि आमचा प्रपंच वाढत चालला आहे, तर मग देव आमचा भार कां वाहत नाहीं? यांतही पुनः एक विचार आहे. हा भक्तिमार्ग साध्यांकरितांही नव्हे. त्यांचे मार्ग निराळे; त्यांचीं शास्त्रें निराळीं; तरी ज्याला प्रपंचाचा गाडा ओढावयाचा आहे, दोन वाटा फुटतात अशा रस्त्यानें ज्याला जावयाचें आहे, आणि नानाविध संशयांनीं, कल्पनांनीं व संकल्पांनीं ज्याला सुचेनासें झालें आहे; असा जो प्रपंचाचा भारवाही त्याचें दैन्य देव हरतो; त्याचें ओझें देव वाहतो; आणि त्याला धरून मार्गास लावितो; असा तुकारामबाबांचा सिद्धांत आहे. मात्र त्यानें एका भावानें देवास अनुसरलें पाहिजे. याला साक्ष ज्यानें त्यानें मनांत विवंचना करावी, म्हणजे मिळण्यासारखी आहे. जेणेंकरून आपण अगदीं बेदिल होतों असा विशेष अडचणीचा प्रसंग राहूं द्या. संसारांत अनेक ऋणानुबंध जोडावयाचे असतात; अनेक

असतात; हें सर्व ओझें कोणी, सोसले याचा विचार केला असता. तें सहन करण्याचें अथवा करविण्याचें सामर्थ्य तुमचें आमचें नव्हे, हें सहज दिसून येईल. अतिशय दुःखकारक प्रसंगीं आपण नास्तिक नसतांही देवाला दूषण देण्यास तयार असतों अशी अंतःकरणाची वृत्ति होते. ती हा विचार करितांना प्रमाणभूत नव्हे. सतत नैसर्गिक स्थिति पाहिली आणि एकंदर लोकांची योगक्षेमचिंता कोण करितो. स्वतःच्या प्रपंचाचा भार वाहण्यास अथवा दुसऱ्यांचा वाहविण्यास कोण प्रेरणा करितो, इत्यादि गोष्टीचा विचार केला, तर आपणांस आपली योगक्षेमचिंता कोण वाहत आहे आणि आपलें ओझें लोकांकडून वाहवीत आहे व आपणांस वाईट मार्गापासून परावृत्त करीत आहे, याविषयीं आपली खात्री होईल.

आपली सार्वत्रिक साहजिक स्थिति अशी असते कीं, आपण पुण्यवान् नाहीं तर अत्यंत पापीही नाहीं; आणि आपण खड्डयांत पडण्याचा संभव असतो. संसारांत अनेक प्रकारचे व्याप असतात व आपण प्रपंचाचा गाडा वाहतों तें सर्व तुम्ही आम्ही करीत नाहीं; तथापि परमेश्वराची रम्य लीला म्हटली आहे ती येथेंच अनुभवास येते. ती अशी कीं, अनेक घोटाळ्यांत पाडण्याच्या आडवाटांतून सरळ बिनधोक्याचा मार्ग आपणच शोधून काढतों; डोंगरावर भार आपणच नेऊन पोहोंचवितों, आणि एकंदर खटाटोप आपल्याच सामर्थ्यानें चालला आहे असें आपणांस वाटत असतें, आणि नाना संकल्पविकल्पांनीं आपण वारंवार गडबडून जात असतों, तेव्हां आपला वाली, कैवारी, मातापिता व साह्यकारी होऊन आपली अडचणींतून सोडवणूक कोण करितो, तें आपणास कळत नाहीं. सूक्ष्म विचार केला, तर यत्किंचित् बिघाड कोठेंही झाला असतां तो नीट करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसतें असें दिसून येईल. साध्यांच्या गौरवाची अथवा सिद्धांच्या तयारीची घमेंड मुळींच नसून, आपली दुर्बलता व परवशता ज्यांस कळत असते तेच धर्ममार्गांतील दीन. ते एकनिष्ठेनें देवाला शरण गेले असतां तो त्यांचा नेता व पाठीराखा होतो. वास्तविक पाहातां, परमदयाळु परमेश्वरच आपणां सर्वांचा त्राता व मार्गदर्शक आहे. पण दुर्भाग्य हें आहे कीं, परमेश्वरी रम्य लीलेच्या योगानें प्रत्येक मनुष्याला आपण बलवान्, आपण शाश्वत आहों असें वाटून, नश्वरतेच्या व दुर्बलतेच्या भागाचा त्याला अगदींच विसर पडतो. आपला योगक्षेम आपणच चालवितों, असें वाटत असतें; पण तो चालविणारी शक्ति दुसरीच आहे. तरुणपणीं काय, म्हातारपणीं काय, जे कष्ट व त्रास आईबापें मुलांसाठीं सोसतात ते सर्व त्यांच्यत्कडून करविणारा दुसराच आहे. अशी खरी प्रचीति असावी; ती सर्वांना होत नाहीं. ज्याला झाली आहे त्याला सर्व ऐहिक संबंधाची कडीनकडी दुसऱ्यानें गुंतविलेली आहे असें वाटतें; व या गोष्टीची विस्मृति होऊं न देतां प्रापंचिक दुःसह ओझें डोक्यावरून उतरावें म्हणून ईश्वराचे जो पाय धरितो, तो साध्य व सिद्ध




**श्री. हनुमानसिंह ठाकोर, बालमित्र साईनाथ भजनी मंडळ, ७६३,- कसबा पेठ, पुणें हे अलिकडेच आलेला आपला एक अनुभव पुढील-प्रमाणें कळवितातः—**

श्रीसद्गुरु साईबाबांच्या पवित्र वचनाप्रमाणें अगदीं अल्प काळांत अनुभवास आलेला बाबांचा अनुभव ( चमत्कार ) आपणांकडे पाठवित आहे तो असाः

माझ्या पहिल्या मुलीच्या लग्नाचेवेळीं दुसऱ्या मुलीचेंही लग्न व्हावें अशी इच्छा होती; आणि त्या दृष्टीनें प्रयत्नही चालूच होते. (दोन्ही मुली लग्नाच्या होत्या म्हणून ) वाटलें दोघींचें लग्न जमले म्हणजे मोकळा झालों. आणखी श्री. बाबांच्या सेवेस जास्त वेळ घालवितां येईल व मागील विवंचनाही मिटेल. परंतु आटोकाट प्रयत्न करूनही जमलें नाहीं. ह्या गोष्टीबद्दल मनांस थोडी हुरहुर लागून राहिली. थोरल्या मुलीचें श्रीबाबांच्या कृपेनें उत्तम प्रकारें लग्न झालें, पण दोन नंबरच्या मुलीचें कां जमले नाहीं ! स्थळतर फारच उत्तम होतें. श्री बाबांच आपल्या भक्तांवर संपूर्ण नजर ठेवतात, चौकशी अंतीं व पत्रिका वगैरे तपासून पाहतां असें कळूल आलें कीं, माझ्या मुलीस पत्रिकेंत मगंळ आहे, आणि त्या पत्रिकेस जुळेल अशीच पत्रिका असलेलें स्थळ मुलीं करिता पाहिले पाहिजे. त्यातून आवड निवड अशी अडचण निर्माण झाली. आणि मुलीचें कसे आणि केव्हां जमेल असा बिकट प्रश्न डोळ्यापुढें उभा राहिला.

माझी श्रीसाईबाबांवर पूर्ण श्रद्धा. आणि सर्व कुटुंब श्रीसाईबाबांचे भक्त, आम्हां

---

आपापली व्यवस्था लावून घेतात, तसा साधकमार्गातल्या लोकांचा प्रकार नसतो; आणि साधकांपैकीं जे ओझ्याच्या भाराखाली दडपलेले देवास अनन्यभावाने शरण जातात त्यांचा योगक्षेम तो चालवतो व त्यांस हातानें धरून सरळ मार्गास लावितो, असा तुकारामबाबांचा प्रतिज्ञापूर्वक उपदेश आहे. अहंपणाचा पडदा थोडासा दूर केला असतां, याच्या सत्यतेचा अनुभव येतोः

---

सर्वांचा त्यांचेवरच भरंवसा मनुष्य अज्ञानामुळें नेहमीं धडपडत करीत असतो. वरील गोष्टीमुळें माझ्या मुलीच्या मनावर फारच परिणाम झाला. मंगळ असलेलें स्थळ फारच कष्टानें क्वचित एखादे आणि महागही पडतें, असें म्हणतात. वडिलांची परिस्थिती मध्यमवर्गीय, कसे होणार ह्या विचारानें मुलीच्या शरिरावरही परिणाम झाला.

माझेकडे नित्य नियमानें येणारी मुलें. दर गुरुवारीं श्रीसाईबाबांच्या आरत्या व श्रीसाईबाबांचीं भजनें असा कार्यक्रम असतो, तो सतत आज १२ वर्षे कोणताही खंड न पडतां चालू आहे. मी माझ्या मुलीस म्हणालों, मुलीं ! मला पित्याची सेवा पूर्ण झाल्याखेरीज मुली आपल्या घरांतून दुसऱ्या घरीं कधींच जात नाहींत. तूं कांहीं काळजीं करूं नकोस. आपले श्रीसाईबाबा कृपावंत आहेत. ते तुझें लग्न योग्य असेंच घडवून आणतील, त्यांची कळ न्यारी आहे. दोनच महिन्यापूर्वीची गोष्ट. एका गुरुवारीं आम्हीं श्रीबाबांच्या आरतीस बसलों असतांना भजनाच्या कार्यक्रमांत काय चमत्कार घडून आला पहा ! माझ्या साधारण परिचयाचे एक गृहस्थ श्रीरामसिंह ठाकोर माझ्याकडे आले आणि संपूर्ण कार्यक्रम होईतोंपर्यंत बसले. नंतर त्यांनीं मंडळाची ( बालमित्र, श्रीसाईनाथ भजनीं मंडळ )ची मोठ्या प्रेमानें प्रशंसा केली. व ओघानें माझ्या मुलीची चौकशी केली; मी त्यांना सविस्तर सत्य परिस्थीती निवेदन केली. ते म्हणाले आम्हांस पत्रिकेंत मंगळ असलेलीच मुलगी पाहिजे आहे. माझा एक पुतण्या लग्नाचा आहे. आपल्या मुलीचीं पात्रिका जुळेल म्हणूनच आपणाकडे आलों आहे. आपल्या घरांत धार्मिकता, आणि पवित्र बातावरण दिसतें. आपण आम्हांस पदरांत घ्यावें अशी उलट विनंती करूं लागले. नंतर यथायोग्य चौकशी झालीं आणि योगायोग म्हणा अगर श्रीसाईबाबांची कृपा म्हणा,—मी मात्र श्रीबाबांची कृपाच समजतों. मुलीकरितां स्थळ पाहाण्यांस एक नवा पैसाही खर्च न होतां पुणें येथील उत्तम प्रकारें, सुशिक्षित कतृत्ववान असा मुलगा ( चिं. उदयसिंह मुन्नासिंह राजपुत ) याचें बरोबर दिं. १९-५-६४ रोजीं थाटानें लग्न झालें. श्रीबाबांची मनोभावें सेवा घडावी म्हणून दर गुरुवारीं उभयता श्रीबाबांच्या आरतीस हजर असतात. अशी आहे आमची साईमाऊली ! मला मात्र एका नवीन साई भक्ताची ओळख झाल्याचा फारच आनंद झाला.

मज भजती जें अनन्यपणें । सेविती नित्याभियुक्तमनें ।
तयांचा योगक्षेम चालविणें । ब्रीद हें जाणें मी माझें ॥

# संत रंगनाथ स्वामी

लेखक : ना. त्र्यं. जवारकर, धुळें

मन हें सर्व इंद्रियांत प्रमुख आहे. आत्मसंयमन करणें हे प्रत्येक प्राणिमात्राचें कर्तव्य कर्म आहे. आत्मसंयमन करून ' नर असून नारायण ' झालेल्याची जी काय थोडीफार उदाहरणें आहेत त्यापैकींच प्रस्तुत संत कवीचें एक आहे. यांचे मूळचे गांव मोंगलाईतील चौसाळे महालातील खडकीं हें होय. म्हणून यांना खडके म्हणत. यांचे पूर्वजापैकीं राघोपंत हे पंढरपूराजवळ नाझरे गांवीं राहण्यास आले. राघोपंताचें अश्व विद्येचे ज्ञान पाहून लोक यांना घोडके म्हणूं लागले. रंगनाथांचे वडिलांचे बोमाजी व मातेचे नांव बयाबाई होते. रंगनाथांच्या जन्म शके १५३४ मध्यें मार्गशीर्ष शु० दशमीचे दिवशीं शनिवारीं झाला. यांना लहानपणापासून दांडपट्टा वगैरे सर्व मर्दानी खेळांचा फार नाद असे; व घरची साधारण श्रीमंती असल्यामुळें त्यांचे हे लाड सहजासहजीं पुरविले जात. हा चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्यांचे लग्नाची आईबापांनी सर्व तयारी केली. पण यानें लग्न न करण्याचाच हट्ट धरला. व घराला रामराम ठोकला. तेथून निघून अशनूर, निरा नरसिंगपूर वगैरे गांवावरून ते बद्रिकाश्रमीं गेले.तेथे राहून त्यानीं कांहीं दिवस योग साधन केलें. परत देशीं येतांना वाटेंत ढेहरी येथील राजानें यांचा अनुग्रह घेऊन यांस घोडा, हत्यारे, मंदील वगैरे अलंकार अर्पण केले. यावेळेपासून रंगनाथ हेच अलंकार लेवून मोठ्या थाटानें राहूं लागले. प्रथम पढंरपूर येथें जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेतलें. तेथें कीर्तन करीत असतांना यांना आईबापानीं ओळखलें. व यास गांवीं घेऊन गेले. बोमजीनें नंतर संन्यास घेतला. श्रीपूर्णानंद स्वामीनी संन्यास देऊन निजानंद नांव दिलें. रंगनाथांनी निजानंदाचाच उपदेश घेतला. यावेळेपासून पुत्रास पित्यानेंच उपदेश दिक्षा द्यावी हा क्रम ह्या कुटुंबांत चालू झाला. निजानंदांनी लवकरच जलप्रवाहांत जल समाधी घेतली ही गोष्ट शके १५६४ साली मार्गशीर्ष वद्य अमावस्येला झाली.

रंगनाथांनीं तीर्थयात्रा केल्या. कोरेगांवचे वाटेवर निर्गुंडीचे बन लागलें. तेथें एका ओढ्याचे कांठीं रंगनाथांचे घोड्याचा पाय रुतला व घोडा पुढें चालेना. हीच परमेश्वराचीं आज्ञा समजून रंगनाथांनीं तेथेंच मुक्काम केला व आपला मठ बांधला. याच मठास निगडीचा मठ असें म्हणतात. या निगडी गांवापैकीं रंगनाथांचे वंशजास सालीना १५०० रुपयांचे इनामे उत्पन्न अजूनहि चालू आहे. रंगनाथास लहानपणापासून शिपाईगिरीचा पेशा फार मनापासून आवडे व त्याचा थाट ऐश्वर्य संपन्न

असे. निळ्या घोड्यावर बसून कमरेला तरवार व बरोबर लंगोट बंद शिष्य समुदाय घेऊन ते फिरत. मठांत तर त्यांचा थाट याहूनही श्रीमंतीचा असे.

रंगनाथांचा व रामदास स्वामींचा फार दाट परिचय असे; व म्हणून त्यांची गणना श्रीरामदास पंचायतनांत केली जाते. (१) श्रीसमर्थ रामदास स्वामी परळीकर (२) जयराम स्वामी वडगांवकर (३) रंगनाथ स्वामी निगडीकर (४) केशव स्वामी भागांनगरकर (५) आनंदमूर्ति ब्रह्मनावकर या पांच सत्पुरुषांचा समावेश रामदास पंचायतनांत होतो. या सर्व पुरुषांच्या करवी शिवकालीन महाराष्ट्रांत समर्थांनी जी चेतना घडवून आणली त्यांत रंगनाथाचेहि मोठे कार्य झालेले आहे. रंगोलेबा भागानगर येथें केशवस्वामीस भेटण्यास गेले असतां त्यावेळीं त्या शहरांत एक सुस्वरूप नायकीण राहात असे. तिला चंदम्मा व भागम्मा या दोन मुली होत्या. त्या परमसुंदर असून तारुण्याच्या ऐन भरांत होत्या. तरी पण त्या पिढिजाद धंद्याला लागल्या नव्हत्या. त्या मुली रंगोबाचे तेज पाहून मोहित झाल्या व त्यांनीं त्यांचेशी झुलबा करणेचे ठरविले. हातात पुष्पमाला घेऊन त्यांचे गळ्यांत घालण्यास हात उंच करतांच रंगोबांनी त्यांचे डोक्यांवर हात ठेवले. तोंच "ब्रम्हानंदी लागली टाळी कोण देहातें सांभाळी" अशी त्या दोघांची स्थिती झाली. तो चमत्कार पाहून सर्वांस परमाश्चर्य वाटले. रामदासस्वामी वगैरे इतर सर्व पंचायतवाले संत हजर होते. पुढें रंगोबांनीं त्या दोघींना गुरुपदेश दिला. व त्यावेळेपासून त्या त्यांच्या शिष्यिणी बनल्या.

शिवाजीमहाराज जेव्हां प्रथम रंगोबाचे भेटीस गेले तेव्हां भोजनानंतर विडा खाऊन हे मंचकावर पडले होते व वडील दोन शिष्यिणी यांचे पाय चेपीत होत्या. हें पाहून राजाचे मनांत त्यांचे साधुत्वाबद्दल शंका आली. तेव्हां अंतरज्ञानाने हे जाणून रंगोबा म्हणाले जरी आपण हे भोग भोगतों तरी या भोगांनीं आपण बद्ध नाहीं व कोणतीही जड देहाची उपाधी आपणांस नाहीं अशी त्यांची खात्री करून दिली. एकदां ते ऐश्वर्य टाकून एका वस्त्रानिशी एका ओढ्यावर बसले. शिष्य भिक्षा मागण्यास एका जवळचे गांवात गेले, इतक्यांत लमाणाचा तांडा बैलावर गोण्या लादून तिकडून चालला असतां त्यांचे मुख्यानें रंगोबाला ओळखून अशा वेशांत आज कां? विचारलें. व लागलीच सर्व शिधा कपडे, घोडा वगैरे त्यांस अर्पण केले. इ ऐश्वर्य एका दोन तासांत पुन्हां आपोआप मिळाल्याचें पाहून सर्वत्रास महाराजांचे सामर्थ्याचे आश्चर्य वाटले.

रंगनाथ आपले वयाचे ७२ व्या वर्षी शके १६०६ रक्ताक्षी संवत्सरी मार्गशीर्ष व. दशमीस प्रातःकाळीं समाधिस्त झाले. हे दत्तोपासक असून आनंद सांप्रदायी होते; हे माध्यंदिन शाखेचे वासिष्ट गोत्री ब्राह्मण कुळांत जन्मले होते. त्यांना गुरु गीता,

# चित्ताची एकाग्रता

— संत विनोबा

परमार्थ, गीता वगैरे ग्रंथ, साधूंसाठीच आहेत अशी एक भ्रामक कल्पना कित्येक लोकांची झालेली आहे. एक गृहस्थ म्हणाला, 'मी कांहीं साधु नाहीं.' याचा अर्थ असा कीं साधु नांवाचे कांहीं प्राणी आहेत, त्यांच्यापैकीं तो गृहस्थ नव्हता. जसे घोडे, सिंह, अस्वल, गाय वगैरे प्राणी आहेत, तसे साधु नांवाचेहि प्राणी आहेत. आणि परमार्थ ही कल्पना त्यांच्यासाठीं फक्त आहे. बाकीचे व्यवहारांत वागणारे ते जणूं कांहीं निराळे, त्यांचे विचार निराळे, आचार निराळे ! ह्या कल्पनेमुळें साधुसंत व व्यावहारिक लोक वेगवेगळे केले गेले आहेत. गीता–रहस्यांत टिळकांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून घेतलें आहे. गीता हा ग्रंथ सर्वसाधारण व्यावहारिक लोकांसाठीं आहे ही टिळकांची भूमिका मी अक्षरशः खरी मानतों. भगवद्गीता ही तमाम दुनियेसाठीं आहे. परमार्थातील सर्व साधन प्रत्येक व्यावहारिक माणसासाठीं आहे. आपला व्यवहार शुद्ध व निर्मळ होऊन मनाचें समाधान व शांति कशी लाभावी हें शिकविणारा परमार्थ आहे. व्यवहार शुद्ध कसा करावा, हें शिकविण्यासाठीं गीता आहे. जेथें तुम्ही व्यवहार करीत आहांत तेथें गीता येते; परंतु तेथें ती तुम्हांला ठेवूं मात्र इच्छित नाहीं. तुमचा हात धरून तुम्हांला शेवटच्या मुक्कामावर ती घेऊन जाईल. ती प्रसिद्ध म्हण आहे ना कीं 'पर्वत जर महंमदाकडे येत नसेल तर महंमद पर्वताकडे जाईल.' आपला संदेश जड पर्वतासहि मिळाला अशी चिंता महंमदास आहे. पर्वत जड आहे म्हणून तो येण्याची वाट पहात महंमद बसणार नाहीं. हीच गोष्ट गीता ग्रंथाची. गरीब, दुबळा, अडाण्यांतलाहि अडाणी असो, त्याच्याजवळ गीता येईल. परंतु तेथें त्यालाच कायम करावा म्हणून नव्हे; तर त्याचा हात धरून पुढें नेण्यासाठीं, उंच नेण्यासाठीं. मनुष्यानें आपला व्यवहार शुद्ध करून परमोच्च स्थिति गांठावी हीच गीतेची इच्छा आहे. एवढ्यासाठींच गीता आहे.

---

रामजन्म, गजेंद्र मोक्ष निजानंद साधने सुदाम चरित्र शुक्र रंभा संवाद, पंचीकरण, मिथ्या भास स्वरूप, श्री एका खडी ओव्याबद्ध मोक्ष विवरण, भानुदास चरित्र, योग वासिष्ठ वगैरे काव्य ग्रंथ केले आहेत.

---

तेव्हां मी जड आहें, व्यावहारिक आहें, सांसारिक जीव आहें, असें म्हणून स्वतःभोंवतीं कुंपण घालूं नका. माझ्या हातून काय होणार, या साडेतीन हात देहांतच माझें सार सर्वस्व आहे, असें म्हणूं नका. ह्या बंधनाच्या भिंती अथवा तुरुंग आपल्याभोंवती उभारून पशु वागतो त्याप्रमाणें वागूं नका. पुढें जाण्याची, उंच चढण्याची हिंमत बाळगा. "**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्**" मी स्वतःला अवश्य वर घेऊन जाईन अशी हिंमत बाळगा. मी क्षुद्र सांसारिक जीव आहें असें म्हणून मनाची शक्ति मारूं नका. कल्पनेचे पंख तोडूं नका. कल्पना विशाल करा. चंडोलाचें असेंच नसतें का ? प्रातःकाळीं सूर्य पाहून तो म्हणतो कीं मी उड्डाण करून सूर्याला गांठीन. तसें आपलें असावें. चंडोल आपल्या दुबळ्या पंखांनी कितीहि जरी उंच गेला तरी सूर्याला कसा गांठणार ? परंतु कल्पना-शक्तिनें सूर्यास तो अवश्य गांठूं शकतो. आपण याच्या उलट वागत असतों. आपण जितकें वर जाऊं शकलों असतों तितकेंहि न जातां कल्पनेला, भावनेला, बांध घातल्यामुळें आपणच स्वतः आपणांस खालीं पाडून घेतों. असलेली शक्ति हीन-भावनेमुळें मारून टाकतों. कल्पनेंचेच पाय मोडले तर खालीं पडण्याशिवाय दुसरें काय होणार ? कल्पनेचा झोक नेहमीं वर असावा. कल्पनेच्या साह्यानें मनुष्य पुढें जातो, म्हणून कल्पना आकुंचित करून घेऊं नका. "**घोपट मार्गा सोडुं नको, संसारामधि ऐस आपुला उगाच भटकत फिरूं नको**" हे रडगाणें गात बसूं नका. आत्म्याचा अपमान करून घेऊं नका. साधकांत जर विशाल कल्पना असेल, आत्मविश्वास असेल, तरच साधकांचा टिकाव आहे. अशानेंच उद्धार होईल. परंतु " धर्म हा संतांसाठींच आहे, संतांकडे जावयाचें तें सुद्धां 'तुमच्या भूमिकेला तुम्ही जसें वागतां तेंच योग्य आहे' असें त्यांच्याकडून प्रशस्तिपत्र घेण्यासाठीं " अशा


# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

कल्पना सोडून द्या. अशा भेदात्मक कल्पना करून स्वतःला बंधन घालूं नका. उच्च आकांक्षा बाळगली नाहीं तर पुढें पाऊल कधींहि जावयाचें नाहीं.

ही दृष्टि, ही आकांक्षा, महान् भावना, जर असेल तर मग साधनांची उठाठेव अवश्य ठरेल; नाहीं तर साराच ग्रंथ आटोपला. बाहेरच्या कर्मांच्या जोडीला मानसिक साधन विकर्म हें सांगितलें. कर्माच्या मदतीला विकर्म सतत पाहिजे. ह्या दोहोंच्या साहाय्यानें जी अकर्माची दिव्य स्थिति प्राप्त होते ती व तिचे प्रकार पांचव्या अध्यायांत पाहिले. सहाव्या अध्यायापासून विकर्मांचे प्रकार सांगितलें आहेत. मानसिक साधना सांगितली आहे. ही मानसिक साधना समजावून सांगण्याच्या अगोदर "बा जीवा, तूं देव होऊं शकशील तूंही दिव्य आकांक्षा जवळ बाळग. मन मोकळें राखून पंख खंबीर ठेव" असें गीता सांगत आहे. साधनेचे, विकर्मांचे निरनिराळे प्रकार आहेत. भक्तियोग, ध्यान, ज्ञानविकार, गुणविकास, आत्मनात्मविवेक वगैरे नाना प्रकार आहेत. सहाव्या अध्यायांत ध्यानयोग हा साधनेचा प्रकार सांगितला आहे.

ध्यानयोगांत तीन प्रमुख गोष्टी आहेत : (१) चित्ताची एकाग्रता, (२) चित्ताच्या एकाग्रतेस उपयुक्त अशी जीवनाची परिमितता, आणि (३) साम्यदशा किंवा समदृष्टि. या तीन वस्तु असल्याशिवाय खरी साधना होणार नाहीं. चित्ताची एकाग्रता म्हणजे चित्ताच्या चंचलतेवर अंकुश. जीवनाची परिमितता म्हणजे सर्व क्रियांचा मोजकेपणा. समदृष्टि म्हणजे विश्वाकडे पाहण्याची उदार दृष्टि. या तीन गोष्टींनीं ध्यानयोग बनतो. ह्या तीन साधनांनाहि साधनें आहेत. तीं म्हणजे अभ्यास आणि वैराग्य. या पांचहि गोष्टींचा थोडा ऊहापोह करूं.

प्रथम चित्ताची एकाग्रता. कोणत्याहि कामांत चित्ताची एकाग्रता अवश्य लागते. व्यावहारिक गोष्टींत सुद्धां एकाग्रता लागते. व्यवहारांतले गुण निराळे व परमार्थांतले गुण निराळे असें कांहीं नाहीं व्यवहार शुद्ध करणें म्हणजेच परमार्थ. कोठलाहि व्यवहार असो. तेथील यशापयश तुमच्या एकाग्रतेवर अवलंबून आहे. व्यापार, व्यवहार, शास्त्रशोधन, राजकारण, मुत्सद्देगिरी, कांहींहि घ्या; प्रत्येक ठिकाणीं जें यश मिळेल तें त्या त्या पुरुषाच्या चित्ताच्या एकाग्रतेवर आहे. नेपोलियनची अशी गोष्ट सांगतात कीं युद्धाची व्यवस्था एकदां नीट लावून दिली म्हणजे तो समरभूमीवर गणिताचे सिद्धान्त सोडवीत असे. तंबूवर गोळे पडत, माणसे मरत, पण नेपोलियनचे चित्त गणितातच मग्न. नेपोलियनची एकाग्रता फार मोठी होती असें मी म्हणत नाहीं. त्याहून उच्च एकाग्रतेच्या गोष्टी सांगतां येतील. परंतु ती त्याच्याजवळ किती होती तें पहा. खलिफा उमरची अशीच गोष्ट सांगतात. लढाई चालू असतांना जर प्रार्थनेची वेळ झाली तर




# एप्रिल १९६४

या महिन्यांत शिर्डी येथें भक्तांची गर्दी बरीच होती. याचें कारण मे महिन्याची सुट्टी म्हणून. कांहीं कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**

श्रीमती द्वारकाबाई भ्र. पुरुषोत्तम कुलकर्णी मु. जालना, जि. औरंगाबाद ( मराठवाडा ) श्री. शांताराम रघुनाथ कुलकर्णी जळगांव, श्री. कृष्णराव जोशी शेंगाव ( वऱ्हाड) श्री. सदाशिव केशव दशनूरकर मु. मनमाड. सं. गवई विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें दोन एकादशीचे दिवशी. श्रीसंत भाऊ महाराज कुंभार पुण्यतिथि. श्री अक्कलकोट स्वामी पुण्यतिथि. श्री परशरामजयंती, श्री. नरसिंह जयंती अशी सहा कीर्तनें या महिन्यांत झालीं.

---

लगेच चित्त एकाग्र करून गुडघे टेकून भर रणांगणांत तो प्रार्थना करूं लागे व प्रार्थनेंत त्याचें चित्त इतकें निमग्न व्हावें कीं कोणाची माणसे कापली जात आहेत याची जाणीव त्याला नसे. पहिल्या मुसलमानांच्या या परमेश्वरनिष्ठेमुळें, या एकाग्रते-मुळेंच, इस्लाम धर्माचा प्रसार झाला.

परवां मी एक गोष्ट ऐकली. एक मुसलमान साधु होता. त्याच्या अंगांत बाण बसला. त्या बाणामुळें फार वेदना होत होत्या. बाण काढावयास जावें तर हात लावतांच जास्त वेदना होत. अशा रीतीनें तो बाण काढतांसुद्धां येईना. हल्लींसारखें क्लोरोफॉर्म हें गुंगीचे औषध त्यावेळीं नव्हतें. मोठा प्रश्न पडला. त्या साधूची ज्या कांहीं माणसांना माहिती होती त्यापैकी कांहीं पुढें येऊन म्हणाले, "बाण काढणें तूर्त राहूं द्या. हा साधु प्रार्थनेस बसला म्हणजे मग तो बाण काढूं." सायंकाळीं प्रार्थनेची वेळ झाली. साधु प्रार्थनेस बसला. एका क्षणांत त्याच्या चित्ताची एवढी एकाग्रता झाली कीं तो बाण त्याच्या शरीरांतून काढला तरी त्याला त्याचें भानहि नव्हतें. केवढी ही एकाग्रता !

———

**गायन**

श्री. लक्ष्मणराव देवासकर कुर्ला, श्री. गणपतराव देवासकर कुर्ला, सौ. प्रभावती बोंदरे, नांदेड, श्री. सोपान आत्माराम पवळे गायन शिक्षक मोहोळ जि. सोलापूर, श्री. लक्ष्मण केशव कर्णिक इंदोर,

**प्रवचन**

श्री. डॉ, के. बी. गव्हाणकर, कुर्ला मुंबई,

**नृत्य**

नृत्य प्रभा मंडळी कृष्ण पणीकर आणि कंपनी माहीम ६

**कै. श्री. गंधे**

२।५।६४ शनिवार रोजीं शिर्डी संस्थानचे ओव्हरसियर श्री. गंधे मेंदुतील रक्तस्त्रावाने एकाएकी निधन पावले. हे नमूद करण्यास अत्यंत दुःख होत आहे. श्री. गंधे हे त्यांच्या प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावामुळें केवळ शिर्डी येथील नोकरवर्गातच नव्हे तर शिर्डीस येणाऱ्या अनेक भक्तजणांत लोकप्रिय झाले होते.

संस्थानच्या बागा व श्री. साईनाथ हॉस्पिटलची इमारत ह्या बाबतींत त्यांनीं घेतलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत. श्री. गंधे यांच्या आकस्मिक निधनाने सर्वांनाच फार हळहळ वाटली. श्री. गंधे याचे दुःखद निधनाने त्यांचे कुटुंबावर जी आपत्ति ओढवली आहे व त्यांना जें अपरिमित दुःख झाले आहे त्यांत शिर्डी संस्थानचा सर्व नोकरवर्ग सहभागी आहे.

**थोरामोठ्यांच्या भेटी**

ना. शेषराव वानखेडे ( मंडळीसह ), मे. न्या. मुधोळकर ( मंडळीसह ), दिल्ली, मे त्रिलोकेकर ( चॅरिटीक. ), मे. कलेक्टरसाहेब अहमदनगर, मे. कलेक्टरसाहेब धुळें, मे. केतकर डॉक्टरसाहेब अहमदनगर, मे. दलालसाहेब ( मंडळीसह ) मुंबई, मे ठिगळे डायरेक्टरसाहेब ( एज्यूकेशन डि. )

**हवापाणी**

शिर्डी येथील हवापाणी उत्तम रोगराई कांहीं नाहीं !



# परमेश्वर प्राप्तीचा उपाय

लेखकः **एक तत्त्वचिंतक**

**खरें बोले तरी। फुकासाठीं जोडे हरि॥**

**ऐसे फुकाचे उपाय। सांडूनिया वायां जाय॥**

वरील अभंगामध्यें परमेश्वरप्राप्तिचा अगदीं सोपा मार्ग सांगितला आहे. केवळ खरें भाषण केल्यानें परमेश्वरप्राप्ति होते. जपतपसाधन नको, यज्ञयाग करावयास नको, योगसाधनाची आवश्यकता नाहीं, देहदंडनाचीहि जरूर नहीं. नुसत्या सत्य बोलण्यानें काम होणार आहे. उपाय तर सोपा आहे, पण तुकारामबुवाच म्हणतात कीं इतका सहज होण्यासारखा उपाय असून तो कोणी करीत नाहीं व त्यामुळें मनुष्यप्राणी आपल्या जन्माचें मातेरें करून घेतो! परमेश्वरप्राप्ति कोणाला नको असते? अगदीं रानटी मनुष्यापासून तों अत्यंत ज्ञानी असणारापर्यंत सर्वांना आपल्याला परमेश्वराचा लाभ व्हावा असें वाटतें. इतकेंच नव्हे तर त्यासाठीं त्यांचे प्रयत्नेंहि चालू असतात. मग हा इतका सोपा उपाय लोक कां करीत नाहींत? ह्यावरून उपाय खरा तरी नसेल किंवा वाटतो तितका सोपा तरी नसेल. खरा नाहीं म्हणावें तर त्यासंबंधानें तुकारामबुवांना प्रतीति आलेली आहे व म्हणूनच त्यांनीं ह्या उपायाची योजना करण्याचा आग्रह धरलेला आहे. दुसऱ्या अनेक ठिकाणीं "**सत्य आठवितां देव। जाते भेव पळोनि॥ सत्यापाशीं देव। उभा स्वयमेव॥ सत्य बोल निरंतर। तोचि पुण्याचा सागर॥ देव त्यानें जिंकियेला॥**" असे त्यांनीं अनुभवयुक्त उद्गार काढलेले आहेत. ह्यावरून त्यांचा अनुभव व विश्वास सत्य भाषण परमेश्वरप्राप्तीचा मार्ग आहे असा असल्याची साक्ष पटते. आपणहि सत्य म्हणजे काय, सत्य भाषण म्हणजे काय व सत्य भाषणानें परमेश्वप्राप्ति कशी होते ह्याचा विचार करू या.

आमचें रोजचें जीवन सत्याला धरून असावें, परस्परांमध्यें होत असलेले व्यवहार सत्याला अनुसरून व्हावे, आपण जीं शास्त्रीय किंवा इतिहासाचीं पुस्तकें वाचतों तीं सत्यानें भरलेलीं असावीं, असा आमचाहि आग्रह असतो. जग सत्यानें चाललें आहे असें आम्ही म्हणतों. एखाद्या पुस्तकांत कांहीं असत्य विधान आहे असें वाटल्यास त्याच्या संशोधनासाठीं आपण मंडळें स्थापितों. आपल्यासभोंवार जो प्रचंड निसर्ग पसरलेला आहे, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष परमेश्वराविषयींचें सत्य काय आहे, हे आपल्याला कळावें ह्याविषयीं आपण परिश्रम करतों. ह्याचें कारण काय? सत्य ही अशी काय चीज आहे कीं तिच्यासाठीं आम्हीं

इतकें झटावें व ती प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याविषयीं इतका अट्टाहास करावा ? सत्य म्हणजे वस्तुस्थिति जशी असते तशी ती दिसणें. प्रथम दर्शनीं तीं जशी आहे असें आपणास वाटतें. तशी ती पुष्कळदां नसते. मनुष्य हा समाजाप्रुब्ध प्राणी आहे. त्याला समाजाबाहेर एकांतवासांत ठेवला असतां तो वेडा होतो. आपण ज्या समाजामध्यें रहातों, त्या समाजाचा आपल्या विचारां-आचारांवर परिणाम घडतो. असा समाजाचा व मनुष्याचा परस्पर संबंध असल्यामुळें आपला प्रत्येक व्यवहार सत्याला अनुसरून होण्यावर आपले सुख अवलंबून आहे. आपण ज्या समाजामध्यें रहातों, त्यांतील एखाद्या माणसाच्या असत्य भाषणावर विश्वासून किंवा लबाडीच्या कृतीला भुलून आपण जर भलत्याच मार्गाला लागलों तर " **असंगाशीं संग व प्राणाशीं गांठ** " ह्या म्हणीप्रमाणें आपल्या जिवावरहि बेतण्याचा संभव असतो. यदा कदाचित् जिवावर बेतलें नाहीं तरी दुसऱ्याच्या फसवेगिरीमुळें आपणांला कोणती स्थिति प्राप्त होईल, पुन्हां पूर्वस्थिति लाभेल कीं नाहीं हें सांगतां येणार नाहीं. असत्य भाषण करणारेहि सत्य भाषणाविषयीं आग्रह धरतात. दुसऱ्यांनीं आपणाशीं सत्यानें वागावें असें त्यांनाहि वाटतें. तेव्हां जगाच्या व समाजाच्या स्वास्थ्यासाठीं सत्यानें वर्तण्याची अत्यंत आवश्यकता असते हें उघड आहे. म्हणून सत्य ह्या शब्दाचा आपण आतां जरा व्यापक दृष्टीनें विचार करूं.

आपण ज्या जगांत रहातों त्यांत नेहमीं घडामोडी व फरक होत असतात. आजची जगाची स्थिति उद्यां नसते. उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा असे


पुरुषार्थ मासिकाचा

# सत्पुरुषांक

अनंत कोटि ब्रह्मांड–नायक **परमेश्वराचे अनंत ऐश्वर्य व सामर्थ्य** संत–जीवनांत कां, कसे व केव्हां प्रगट होते, याची सामान्य कल्पना होण्याचें **एकमेव साधन** म्हणजेच **पुरुषार्थ** मासिकाचा **सत्पुरुष विशेषांक** होय. एकूण भाग ६. पहिला भाग **जुलै** महिन्याचे आरंभीं प्रसिद्ध होईल. वार्षिक ६ रु. वर्गणींतच हे तिन्ही भाग ग्राहकांस मिळावयाचे आहेत.

**स्वाध्यायमंडळ, पारडी ( जि. बलसाड )**

ऋतुमानानें त्यांत फरक पडतात. हे फरक होतात एवढें आपण नुसत्या कानांनी ऐकिलें असतें किंवा ते झालेले डोळ्यांनीं पाहिले असते तर त्यांच्याविषयीं आम्हांला फारसें ज्ञान झालें नसतें. कोणता फरक केव्हां घडतो, त्यांचा क्रम काय, कोणता फरक पडला असतां कसें वागावें ह्याचेंहि ज्ञान झालें नसतें. परंतु आपण ईश्वरदत्त पंचेंद्रियांचा उपयोग करून व मनाला विचार करावयास लावून त्याविषयीं ज्ञान प्राप्त करून घेतों. ते कां होतात, केव्हां होतात, कसे होतात ह्यांविषयीं नियम शोधून काढतों व त्या नियमाना अनुसरून वागल्यामुळें आम्हांला सुख प्राप्त होतें. हे होणारे फरक व्यवस्थेशीर व नियमितपणें होतात, असा आम्हांला अनुभव येतो, जगाच्या स्थितींत फरक पडतील पण हे फरक ज्या नियमांनीं वड्डून येतात त्या नियमांत कधींहि फरक पडत नाहीं. हा जो नियमितपणा ह्याला ईश्वरी कायदा म्हणण्यास हरकत नाहीं. हें निसर्गाचें सत्य, हा नियमितपणा किंवा कायदा, किंवा सत्य शोधून काढीत असता सहजगत्या आम्हांला ह्या नियमाचा धनी जो हरी त्याची ओळख होते. तो जरी डोळ्यांनीं दिसला नाहीं तरी तोच हे सर्व फरक घडवून आणतो. म्हणूनच ही सृष्टीची रचना व तिचे व्यवहार नियमबद्ध आहेत, अशी आमची बालंबाल खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं. सत्यशोधनानें परमेश्वर जोडला जातो तो असा.

ज्या नियमांनीं निसर्गाचे व्यवहार बद्ध झालेले आहेत, ते जाणणें व त्यांप्रमाणें वागणें म्हणजे खरें बोलणें होय. बोलण्याची क्रिया केवळ शब्दोच्चारानें होते असें नसून न बोलतां देखील ती करतां येते. परमेश्वराच्या सत्य नियमांविषयीं ज्ञान प्राप्त करून घेणें व त्याप्रमाणें वर्तन ठेवणें म्हणजेच परमेश्वरप्राप्ति होय. त्या नियमांविषयीं जितका अधिकाधिक शोध लावावा म्हणजे त्यांप्रमाणें वर्तण्याचा जितका अधिक प्रयत्न करावा, तितका संसार सुखमय होतो. आपण निसर्गासंबंधीं जें जें नवीन सत्य शोधून काढतें तें तें अखिल मानवजातीच्या सुखांत भर घालण्याला कारणीभूत होतें, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ह्या दृष्टीनें ह्याचा विचार केला असतां आमच्या ऐहिक सुखासाठीं देखील परमेश्वराच्या नियमांप्रमाणें वागणें अवश्य आहे हें दिसून येईल. मनुष्यानें नित्याच्या व्यवहारांत सत्याला सोडून वागूं नये. ऐहिक सुखाच्या वृद्धीला सत्याची आवश्यकता आहे हें तर आहेच, पण आणखी एका कारणासाठीं सत्य बोलणें व सत्य आचरणें हें माणसाचें कर्तव्य आहे. तें कारण हें कीं सत्याला फांटा देणें म्हणजे परमेश्वराविषयीं व त्याच्या नियमांविषयीं खोटी कल्पना करून देणें म्हणजे पर्यायानें ईश्वराच्याविरुद्ध वागणें होय. असत्य भाषण व असत्य आचरण आपणांला ईश्वरापासून दूर नेतें म्हणून तें त्याज्य आहे.

ईश्वरविषयक सत्यशोधनाविषयीं आमचे प्रयत्न चालू असतात, पण त्यांत

आम्हांला यावें तसें यश येत नाहीं. ह्यामुळें जगावर, रामदासानें म्हटल्याप्रमाणें **"नाना पंथ नाना मतें । भूमंडळी असंख्यातें ॥"** अशी स्थिति झाली आहे. इतर सत्याची प्रतीति गणितांना पहातां येते तशी ईश्वरी सत्याची गोष्ट नाहीं. निसर्गाचे नियम शोधून काढतांना ग्रहांच्या गति, त्यांच्यामधील अंतरें इत्यादिकांचा शोध करतांना आपण आपली निरीक्षणशक्ति पूर्णपणें उपयोगांत आणतों; ज्ञानाचा उपयोग करतों; व आपले पूर्वग्रह बाजूस ठेवून चालतों. धर्मविषयक सत्यशोधनाच्या वेळीं ही शेवटची गोष्ट करावी तशी केली जात नाहीं. ख्रिस्ती धर्माच्या अनुयायाला ख्रिस्तानें केलेले चमत्कार पटतात, पण इतर साधुसंतांनीं केलेले चमत्कार पटत नाहींत. ह्याचें कारणहि पूर्वग्रह. ह्यामुळेंच भिन्नतेची वाढ होते. तरी पण धर्माच्या बाबतींतहि जसजसे सत्यशोधक अधिक होते तसतसे हे फरक नाहीसे होतात व सर्व धर्मांचा मुख्य हेतु जो ईश्वरप्राप्ति, ती मनुष्याला अधिक प्रमाणानें होते. तात्पर्य ऐहिक सुख, जगाचे स्वास्थ्य, मनुष्याची आध्यात्मिक उन्नति व हरीची जोडणूक ह्या सर्व गोष्टींना सत्य भाषणाची म्हणजे खऱ्या वर्तनाची अत्यंत आवश्यकता आहे. तुकारामबुवांनी **'खरें बोलें तरी । फुकासाठीं जोडे हरि ॥'** असें जेव्हां म्हटलें तेव्हां त्यांनीं ह्या दृष्टीनें सत्य किंवा खरें ह्या शब्दाचा विचार केला असेल असें वाटत नाहीं तरी पण सत्याचा कोणत्याहि दृष्टीनें विचार केला असतां शेवटी तो आपणाला हरीपर्यंत नेऊन पोहोंचवितो व त्या हरीचा आम्हांला लाभ करून देतो हें अगदी स्पष्ट आहे.

———

मनुष्य दयाळु आहे. मानवी समाज मात्र क्रूर आहे.

धर्म अंतःकरणास वळण देतो. व शिक्षण हे बुद्धीस वळण देते. म्हणून धर्म व शिक्षण हीं कधींही भिन्न करतां येणार नाहींत.

ज्ञानापेक्षां शुद्ध चारित्र्य व सदाचार जास्त स्पृहणीय आदरणीय व स्तुत्य आहे.

जी माणसें वासनाबद्ध असतात त्यांना शांति मिळत नाहीं.

उद्योग व खेळ यांचे योग्य मिश्रण झाले तर तुम्ही सुखी व समर्थ व्हाल.

—रविंद्रनाथ टागोर

त्याग, शिस्त, संयम या खेरीज मुक्तीची आशा नको.

—महात्मा गांधी

# नामदेवांची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए.

## देखो यारो, देखो लोको

हे पहा मित्रहो आणि लोकहो ! येथें हे काय झाले ? पिंजऱ्यामध्यें बोलणारा प्राणरुपी पोपट कुठें गेला ? सत्यस्वरुपी परमेश्वराचा आदेश मिळाला आणि तो या शहरांतील सुंदर प्रासादांत राहूं शकला नाहीं. त्याला सर्वजण आपला प्राणप्रिय समजत असत आणि सर्वांनीं त्याला खेळीमेळीनें खांद्यावर चढवून घेतले होते आणि ज्याला तूं माझा म्हणत होतास त्या तुझ्या प्राण प्याऱ्याला जाळण्यासाठीं घेऊन चालले आहेत. जिंकणारानें जिंकले आहे. जीवन-मृत्यूची कला त्यानें ( ईश्वरानें ) अशा रीतीनें आपल्या हातांत राखून ठेवली आहे कीं तिचा अंत कोणास लागत नाहीं. जिंकण्याच्या या शक्तीला ( परमेश्वराला ) जें जग जाणते तें सुखानें राहूं शकतें. नामदेवांचा असा दावा आहे कीं, या शक्तीला जाणत नाहीं ती दुनिया मात्र दुःखांत आहे.

१६

## रसना तूं रंगी अले हरी नाम

हे रसने ! तूं हरिनामीं रंगून जा. हरिनाम घेत राहाशील तर सर्व मनःकामना पूर्ण होतील. जेव्हां कांहीं बोलता राहाशील तेव्हां हरिनामाचाच उच्चार कर. नाहीं पेक्षा मुख उघडूं नकोस. तूं विषय वासनेची धनीण आहेस. हे पापिणी ! तूं रामनामाचा जप करीत नाहीस. हे लबाड रसने ! तूं पड्रसमुक्त भोजन अगर पंचपक्वान्न खाण्यात रस घेतेस हरिनाम घेण्यास मात्र आळस करतेस हे रसने ! माझ्या मुखानें आठहि प्रहर हरिनाम गावूं दे असे दान मला दे. केवळ. तीर्थ वर्णनानें तुझें कार्य पूर्ण होणार नाहीं. त्या रामाला प्रणाम करून नामदेव सांगतात कीं तो रामच तुझे तारण करील तुला भवपार नेईल.

:१७:

# हिंदू पूनै देहुरा

हिंदू लोक देवळांत देवाची पूजा करतात; मुसलमान मशिदींत करतात. नामदेव अशा ठिकाणीं पूजा करतो कीं जेथें देऊळ आणि मशीद दोन्हीहि नाहींत. मनरूपी सूई व शरीररूपी दोरा घेऊन हा नामा शिंपी श्रीखेचरनाथांच्या चरणीं लीन झालेला आहे.



सुख व शहाणपणामध्यें इतकाच फरक कीं मी सुखी असें म्हटल्यानें तो खरोखर सुखी होईल पण 'मी शहाणा' म्हटल्यानें तो मूर्ख ठरेल.

आचरण, निश्चय व ज्ञान ही समान असतील तरच मैत्री दीर्घकाल टिकेल.

जोपर्यंत माझ्याजवळ जरूरीपेक्षां अधिक अन्न आहे व दुसऱ्याजवळ मुळींच अन्न नाहीं. जोपर्यंत माझ्याजवळ दोन कपडे आहेतच दुसऱ्याजवळ एकही कपडा नसेल तोपर्यंत जगांत सतत होणाऱ्या पापाचा मी भागीदार ठरेन.

**—टॉलस्टॉय**

मणभर चर्चेपेक्षां कणभर सेवा अमोल असते.

**—विनोबाजी भावे**

जीवन हा सुखानें भरलेला प्याला नसून कर्तृत्वानें भरावयाचें माप आहे.

**—ब्लेक**

विसरणें हा मानवाचा धर्म असला तरी लक्षांत ठेवणें हें मानवाचें माप आहे.

**—साने गुरुजी**

तुम्ही स्वतः प्रामाणिक बनलांत म्हणजे जग एका बदमाष माणसानें कमी होईल याची खात्री बाळगा.

**—कार्लाईल**

मनुष्याची नम्रता संपली म्हणजे त्याच्याकडील माणुसकीही संपलीच म्हणून समजावें.

**—साने गुरुजी**

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) श्रीसाईसच्चरित्र | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| ( २ ) ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४-५० |
| ( ३ ) ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| ( ४ ) ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४-०० |
| ( ५ ) ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| ( ६ ) Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| ( ७ ) Glimpes of Indian Spirituality | ( Telgu ) | | १-०० |
| ( ८ ) श्री साईलीलामृत | ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| ( ९ ) ,, | ( हिंदी ) | श्री. चिटणिस-दिल्ली | २-५० |
| ( १० ) साईबाबा-अवतार व कार्य | ( मराठी ) | श्री. घोंड | २-०० |
| ( ११ ) साईबाबांचे ४ अध्याय | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००-५० |
| ( १२ ) सगुणोपासना | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १३ ) ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १४ ) श्री रुद्राध्याय ११ वा | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| ( १५ ) स्तवन-मंजरी | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००-१३ |
| ( १६ ) श्री साई-सुमनांजली | ( मराठी १०८ नांवें ) | | ००-०६ |
| ( १७ ) कीर्तन पंचक | ( मराठी ) | श्री. देव | १-५० |
| ( १८ ) शोलधी | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| ( १९ ) श्री साईगितांजलि | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| ( २० ) Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| ( २१ ) Side lights on Sai Baba | ( Eng. ) | Calcutta | ००-७५ |
| ( २२ ) Guide to Shirdi | ( English ) | | ००-१२ |
| ( २३ ) स्तवनमंजिरी व सुमनांजली | ( मराठी ) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | |
|---|---|
| ( 1 ) Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| ( 2 ) ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| ( 3 ) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.